बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक १५ | बुधवार,दि.१९ मार्च २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतीचा सत्कार




**गोंदिया–** संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सन २०२३–२४ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतीचा सत्कार नवेगावबांध येथील एमटीडीसी रिसॉर्ट येथे आयोजित जिल्हास्तरीय सरपंच मेळाव्यात आज करण्यात आले.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२३–२४ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबविण्यात येवून उत्कृष्ट कार्य करणा–या ग्रामपंचायतीची जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी ऑगस्ट २०२४ मध्य निवड करण्यात आली होती. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सन २०२३–२४ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत जिल्हास्तरावरील प्रथम क्रमांकाचे ६ लाखांचे बक्षीस अर्जुनी मोरगाव तालुक्यातील देवलगाव या ग्रामपंचायतीला, द्वितीय क्रमांकाचे ४ लाखांचे बक्षीस तिरोडा तालुक्यातील नहरटोला तर तृतीय क्रमांकाचे ३ लाखाचे पुरस्कार गोंदिया तालुक्यातील गंगाझरी ग्रामपंचायतीला जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या हस्ते देण्यात आले.

स्व. वसंतराव नाईक–सांडपाणी व्यवस्थापन पुरस्कार सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन पुरस्कार सालेकसा तालुक्यातील दर्रेकसा तर स्व. आबासाहेब खेडकर शौचालय व्यवस्थापन पुरस्कार आमगाव तालुक्यातील शिवणी ग्रामपंचायतीला पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले.कार्यक्रमाला जि.प.पदाधिकारी,सदस्य व अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## शांतता व संयम पाळत धार्मिक सण साजरे करा–मुख्यमंत्री

**मुंबई :** महाराष्ट्र हे ङ्कप्रगतिशील राज्यफ असून या ठिकाणी जातीभेदाला थारा नाही. नागपूर शहरामध्ये १७ मार्च रोजी राज्याची सामाजिक घडी विस्कटणारी घटना घडली. या घटनेमुळे राज्याच्या शांततेला धक्का बसला. सध्या सर्वधर्मियांचे सण सुरू आहेत. नागरिकांनी संयम बाळगून शांतता राखत हे सण साजरे करावेत, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत नागपूर घटनेवर आधारित निवेदनाद्वारे केले.

नागपूर येथील प्रकरणात पोलीस शांतता प्रस्थापित करण्यासाठी गेले होते. त्यांच्यावरही जमावाने हल्ला केला. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था हातात घेणाऱ्या आणि पोलिसांना मारहाण करणाऱ्या कुणालाही सोडले जाणार नाही. त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा स्पष्ट शब्दात मुख्यमंत्री फडणवीस यांनी इशाराही दिला.घटनांमध्ये ३३ पोलीस जखमी झाले असून ५ नागरिक जखमी झाले आहेत. यापैकी ३ नागरिकांना उपचाराअंती सोडण्यात आले, तर २ नागरिकांवर उपचार सुरू आहेत.

## महालमधील जाळपोळ,दगडफफेक,तोडफफोडीचे पडसाद अन्य भागातही



**परिस्थिती आता नियंत्रणात आहे. सध्या परिस्थिती शांत आहे. एक फोटो जाळण्यात आला, त्यानंतर लोक जमले. या गर्दीला पांगवण्याचा आम्ही प्रयत्न केला. या संदर्भात आम्ही कारवाईही केली. आरोपींवर कारवाई केली जाईल.**

**– डॉ रवींद्र कुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर**

**नागपूर :–** विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने औरंगजेबची कबर हटवण्यासाठी केलेल्या आंदोलनानंतर सोमवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास दोन गटात संघर्ष पेटला. जवळपास चार तास महाल परिसर, चिटणीस पार्क परिसर यासह अन्य ठिकाणी तुफान दगडफफेक, तोडफफोड, रस्त्यावर जाळपोळ आणि नारेबाजी करण्यात आली. परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी आटोकाट प्रयत्न केले. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे पोलिसांना अश्रु धुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या तर लाठीमार सुद्धा करावा लागला. रात्री उशिरापर्यंत पोलिसांची असामाजिक तत्त्वांची धरपकड सुरू होती. परिस्थिती नियंत्रणा बाहेर असल्याचे लक्षात येतात पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांनी शहरातील काही भागात संचारबंदीचे आदेश लागू केले. या हिंसाचारात आतापर्यंत २० ते २२ पोलिस जखमी झाले आहेत. त्याच वेळी, ८० हून अधिक आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

महाल परिसरात काल उसळलेल्या दंगलसदृश्य परिस्थितीचे पडसाद आज शहरभर उमटले. शहरातील संवेदनशील भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले. मात्र पोलिसांनी सशस्त्र जवानांना बंदोबस्तासाठी तैनात करीत परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मात्र सोमवारी रात्री अनेक गाड्यांची तोडफफोड अनेक गाड्यांना आग लावणे किंवा दुकानावर दगडफफेक करणे या प्रकारामुळे शहरातली परिस्थिती हाताबाहेर गेली असून पोलीस मोठ्या प्रमाणात संवेदनशील भागात तैनात करण्यात आले आहेत.नागपुरात कबर हटवण्याच्या मागणीवरून सोमवारी रात्री (१७ मार्च) मोठा तणाव निर्माण झाला. दोन गटात झालेल्या दगडफफेक आणि जाळपोळच्या घटनेमुळे नागपुरात सध्या तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान, भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत नागपूर शहरातील अनेक भागात संचारबंदी लागू करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र पोलिसांच्या अधिकृत अधिसूचनेतून समोर आली आहे. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

नागपूर पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांनी जारी केलेल्या अधिकृत आदेशानु–सार, पुढील सूचना मिळेपर्यंत निर्बंध लागू राहतील. कोतवाली, गणेशपेठ, तहसील, लकडगंज, पाचपावली, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोधरानगर आणि कपिलनगर येथील पो–लीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. तसंच, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना प्रभावित भागातील रस्ते बंद करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. संचारबंदीचे उल्लंघन करणारा कोणीही भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अंतर्गत दंडनीय राहील.



## पशुवैद्यकीय दवाखान्याकडे डॉक्टरांची पाठ,औषधांचा साठा उघड्यावर



**गोंदियाः–** राज्य पशुधन वैद्यकीय अधिकारी व पशुधन पर्यवेक्षकांच्या चुकीच्या धो–रणामुळे आणि पशुवैद्यकीय अधिकार्यांच्या दुर्लक्षामुळे रुग्णालय परिसरात मुदतबाह्य औषधासंह उपयोगी असलेल्या औषधांचा साठा रुग्णालयाच्या बाहेर आणि वर्हाड्यांत कचरा समजून फेकल्याचे चित्र जिल्ह्यातील शेंडा, चिखली आदी पशुवैद्यकीय रुग्णालय परिसरात बघावयास मिळाले. यावरुन शासकीय कर्मचाऱ्यांकडून शासकीय मालमत्तेचा एकप्रकारे नासधूस करण्याचा प्रकार असून पशुवैद्यकीय रुग्णालयात सतत गैरहजर राहून प्रभार असलेल्या ठिकाणी असल्याचे सांगत दिशाभूल करणाऱ्यावर प्रशासनाने गंभीर दखल घेत योग्य ती कडक कारवाई करण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांच्या संवर्धन व संगोपनासाठी राज्य पशुसवंर्धन व जिल्हा पशुसंवर्धन विभागाकडून विविध सेवा दिली जाते. यामध्ये जनावराचे लसीकरण, विविध साथींच्या आजारावर उपचार करण्यासाठी औषधे, सलाईनचा मोफत पुरवठा केला जातो.मात्र पशुवैद्यकीय अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक हे नियमित हजर राहत नसल्याने लाखो रुपये किमतीचे औषधे, सलाईन, पावडर, टॅबलेटस मुदतबाह्य होऊन पडल्या असल्याचे प्रत्यक्ष पाहणी दरम्यान दिसून आले. गेल्या दोन दिवसा–पासून सातत्याने जिल्ह्यातील श्रेणी १ पशुवैद्यकीय दवाखाने व पशुवैद्यकीय दवाखान्याना भेट दिली असता एका पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडे १ ते ३ पशुवैद्यकीय दवाखान्याचा प्रभार असल्याचे जाणवले.या गोष्टीचाच लाभ घेत पशुवैद्यकीय अधिकारी हे यापैकी एकाही ठिकाणी हजर राहत नसल्याचे दिसून आले.तर विचारणा केल्यावर आपण दुसर्या पशुवैद्यकीय दवाखान्यात असल्याचे सांगतात, मात्र तिथे पोचल्यावर तेथील कम ‘चारी मात्र साहेब आलेच नसल्याचे सांगत असल्याने पशुवैद्यकीय अधिकारी शासनासोबतच जनतेची सुध्दा फसवणूक करीत असल्याचे दिसून आले.

पशुवैद्यकीय दवाखान्याचा वेळ सकाळी ९ ते ४ वाजेपर्यंतचे असून देवरी येथील पशुवैद्यकीय दवाखाना, त्यानंतर सडक अर्जुनी तालुक्यातील शेंडा, सडक अर्जुनी व चिखली येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांना भेट दिल्यावर यावेळेत एकही पशुवैद्यकीय अधिकारी हजर नव्हते. तर सालेकसा तालुक्यातील सालेकसा, पिपरीया येथील पशुदवाखान्याची हीच परिस्थिती असून आत्ताच आपण तिथून आलो असे सांगून पशुवैद्यकीय अधिकारी हे सर्वसामान्य पशुपालकांची फसवणूक करत असल्याचे दिसून आले.सडक अर्जुनी तालुक्यातील शेंडा पशुवैद्यकीय दवाखान्याचे रंगरंगोटीचे काम सुरु असून या दवाखान्यातील उपयोगी असलेली औषधी ही व्यवस्थित न ठेवता कचर्यासारखी फेकून ठेवली आहे. तर चिखली येथील पशुवैद्यकीय दवाखानाच्या मागच्या भागात २०२५ जानेवारी व फेब्रुवारीमध्ये मुदत संपलेल्या सलाईन फेकण्यात आल्याचे दिसून आले.

जिल्ह्यातील पशुपालकांना गेल्या अनेक वर्षापासून पशुवैद्यकीय दवाखाना आहे राम भरोसे झाले आहे. त्यामुळे येथील पशु जनावरांना वेळेवर उपचार मिळत नाही. त्यामुळे पशुवैद्यकीय व इतर शासकीय योजना पासून लाभार्थी वंचित झाले आहेत. विशेष म्हणजे सन २०२२ मध्ये शासनाकडून मराठवाडा पॅकेज करिता अर्ज मागविण्यात आले होते. त्यामध्ये मराठवाडा योजनेत लाभार्थ्यांची निवड झाली आहे. परंतु गेल्या दोन ते तीन वर्षापासून पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे आजही फाईल धुळखात आहे.सालेकसा येथील पशुवैद्यकीय अधिकारी गोंदिया व आमगाव वरून अपडाऊन करतात. तर शेंडा व सडक अर्जुनी येथील पशुधन पर्यवेक्षक श्री.पदम हे दोन्ही ठिकाणी आज गैरहजर होते. तर सडक अर्जुनीच्या पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.शितल वानखेडे या दवाखान्यात पोचल्याच नाही.तर चिखलीच पशुवैद्यकीय दवाखान्याचे डॉ.सौरभ कवठे यांनी ३ वाजेपुर्वीच दवाखाने बंद करुन निघून आले.सडक अर्जुनी तालुका पशुधन विकास अधिकारी(विकास) श्री वाघाये गोंदियात मिटिंगमध्ये असल्याचे सांगितले.

पशुधन पर्यवेक्षक व पशुवैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी सुद्धा मुख्यालय राहत नसून ते बाहेर गावावरून येजा करीत असल्यामुळे पशुवैद्यकीय दवाखाने हे सुखसुकाट व मोकाट पडले आहे.सालेकसा,देवरी व सडक अर्जुनी हे तालुका नक्षलग्रस्त क्षेत्र परंतु आजही पशुवैद्यकीय अधिकारी हे दवाखान्यात नियमित येत नसल्याने व या भागातील लोकप्रतिनिधींचा त्यांचावर वचक नसल्यानेच ते कधीही येऊन जात असल्याचे नागरिकांचे म्हणने आहे.




## १५ कोटींच्या निधीतून ५० बेडचे आयुष हॉस्पिटल उभारले जाणार





**गोंदिया:–** कोविड संकटाच्या काळात जिल्ह्यात आधुनिक वैद्यकीय सुविधांबरोबरच योग, आयुष काढा आणि नैसर्गिक उपचार पद्धतींची गरज प्रकर्षाने जाणवली. मात्र, घढड आणि इत्र्थ रुग्णालयांमध्ये या उपचारांसाठी पुरेशी जागा नव्हती. या आव्हानाला पाहता, आमदार विनोद अग्रवाल यांनी पुढाकार घेतला आणि शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून अनेक बैठका घेतल्यानंतर टीबी टोली परिसरातील टीबी हॉस्पिटल ग्राउंडवरील जागा या प्रकल्पासाठी आरक्षित करून घेतली.

जमीन उपलब्ध झाल्यानंतर विधायक विनोद अग्रवाल यांनी आणखी एक मोठे यश मिळवले. त्यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे शासनाने १५ कोटी रुपये खर्चून उभारल्या जाणाऱ्या ५० बेडच्या आयुष रुग्णालयाला मंजुरी दिली. या रुग्णालयाच्या उभारणीमुळे गोंदिया जिल्ह्यात आरोग्य सुविधांमध्ये मोठी भर पडेल आणि नागरिकांना आधुनिक वैद्यकीय उपचारांसोबत आयुष पद्धतीचे उपचारही सहज उपलब्ध होतील.आमदार विनोद अग्रवाल यांनी या रुग्णालयाच्या मंजुरीसाठी प्रयत्न करून जिल्ह्याच्या जनतेसाठी मोठी भेट दिली आहे. हे रुग्णालय केवळ गोंदियाच्या नागरिकांसाठीच नव्हे, तर आसपासच्या भागांतील रुग्णांसाठीही अत्यंत लाभदायक ठरेल.आगामी काळात हे रुग्णालय आरोग्य सेवेत नवे आयाम निर्माण करेल.

## एका क्लिकवर मिळवा जिल्हा पोलिस दलाची माहिती

**गोंदिया:–** जिल्ह्यातील नागरिकांना जिल्ह्याच्या पोलिस दलाविषयी अद्ययावत माहिती व ऑनलाईन तक्रार व तक्रारीचे निराकरण करण्यासाठी पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या संकल्पनेतून, अप्पर पोलिस अधीक्षक नित्यांनंद झा यांच्या मार्गदर्शनात गोंदिया जिल्हा पोलिस दलाची नविन वेबसाईट कार्यान्वित करण्यात आली आहे.

वेब साईटवर गोंदिया जिल्हा पोलिस दलाची अद्यावत माहीती तसेच जिल्ह्यातील सर्व पोलिस स्टेशन, शाखांची माहीती अद्यावत उपलब्ध करण्यात आली आहे. नागरीकांना पोलिस विभागाशी संबंधीत आवश्यक माहीती याद्वारे मिळणार आहे. या वेबसाईटवर सिटीझन कॉर्नर टॅबमध्ये प्रथमच ऑनलाईन कंप्लेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. केलेल्या तक्रारींवर संबंधीत पोलिस स्टेशनतर्फे कारवाई होणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांना जिल्ह्याच्या पोलिस दलाविषयी अद्ययावत माहिती व ऑनलाईन तक्रार व तक्रारीचे त्यासोबतच कोणत्या नागरीकाने काय तक्रार केली व त्या तक्रारीवर संबंधीत पोलिस स्टेशनने कोणती कारवाई केली हे थेट पोलिस अधीक्षकांना कळणार आहे. तक्रार व कारवाई संदीर्भात पोलिस अधिक्षक नियमीत आढावाही घेणार आहेत. नागरीकांना वेबसाईटवर महिला, मुले, गुन्हे विषयक तक्रार, आर्थिक फसवणुकीची तक्रार, सायबर तक्रार, संपतीविषयी तक्रार, मोबाईल हरविल्याची तक्रार, सायबर फसवणुक झाल्याची तक्रार तसेच भाडेकरुची माहिती व ईतर तक्रारी करण्याची सुविधा नागरीकांसाठी या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.




**जिल्हा पोलिस दल नागरीकांच्या समस्या व तक्रारींचे निरसन करण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहे. नागरिकांना त्रास होऊ नये, पोलिस दलाविषयी अद्यावत माहिती व्हावी यासाठी गोंदिया जिल्हा पोलिस दलाची वेबसाईट कार्यान्वित केली आहे. जिल्ह्यातील नागरिकांना जिल्ह्याच्या पोलिस दलाविषयी अद्ययावत माहिती व ऑनलाईन तक्रार व तक्रारीचे या साईटवर पोलिस दलाच्या माहितीसह अधिकर्ा?याचे संपर्क क्रमांक, तक्रारी, नकाशा, नविन कायदे यासंदर्भात माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी वेबसाईटचा जास्तीत जास्त वापर करून तक्रारींचे निरसन करून घ्यावे.**

**गोरख भामरे, जिल्हा पोलिस अधिक्षक, गोंदिया.**

## अखेर अप्पर आयुक्तानेही अपील फेटाळली

**गोंदिया :–** तालुक्यातील एकोडी येथील ग्राम पंचायत सदस्य नामदेव मोहन बिसेन यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण करून घर बांधकाम केले. या प्रकरणाची तक्रार अर्जदाराने जिल्हाधिकारी गोंदिया यांच्याकडे केली होती. या प्रकरणाची दखल घेत अतिक्रमण करणारे ग्राम पंचायत सदस्यावर अपात्रतेची कारवाई ३१ डिसेंबर रोजी करण्यात आली होती. दरम्यान याविरोधात अपीलार्थी नामदेव बिसेन यांनी विभागीय आयुक्त नागपूर यांच्याकडे दादा मागितली होती. मात्र प्रकरणाची शहनिशा करून अप्पर आयुक्त डॉ. माधवी खोडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय कायम ठेवत अपिलार्थ्यांची अपिल फेटाळली.

सविस्तर असे की, नामदेव मोहन बिसेन हे ग्राम पंचायत एकोडीचे सदस्य आहेत. सन २०२२ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत ते वार्ड क्र.४ येथून ग्रामपंचायतीवर निवडून गेले. ग्राम पंचायत सदस्य पदावर विराजमान असूनही त्यांनी सन २०२० मध्ये शासकीय गट क्र. १४८४ आराजी ०.०२ हे.आर. वर अतिक्रमण करून घर तयार केले आहे. सदर बांधकाम करताना त्यांनी शासकीय प्राधिकरणाची कसलीही परवानगी घेतली नसूनतलाठी रेकॉर्डप्रमाणे गाव नमुना १ ईमध्ये अतिक्रमणाची नोंद आहे. या संदर्भात ग्रा.प. सदस्य बिसेन यांनी ग्राम पंचायतमध्ये फ ेरकार केले. त्यामुळे मालमत्ता क्र. ८२१ ग्राम पंचायत नमुना ८ मध्ये कराची नोंद आहे. तसेच अतिक्रमण करून तयार करण्यात आलेल्या घरात राहत आहेत. महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियमचे कलम १४ (१) (ज–३) नुसार अतिक्रमणकर्ता सदस्य पद धारण करण्यास अनर्ह ठरविण्यात यावे, अशी तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्जदाराने केली होती. या तक्रारीची शहनिशा करून संबंधितांना यावर जाब विचारण्यात आला. दरम्यान केलेली चौकशी आणि पुराव्यात ग्राम पंचायत सदस्य नामदेव बिसेन यांनी अतिक्रमण केल्याचे समोर आले. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी ३१ डिसेंबर रोजी आदेश पारीत त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई केली. दरम्यान या निर्णयाला आवाहन देत अपिलार्थी नामदेव बिसेन यांनी अप्पर आयुक्त नागपूर यांच्याकडे दाद मागितली होती. या प्रकरणी उपअधिक्षक भूमि अभिलेख, तलाठी व गावातील पंच तसेच नगर भूमापन यांनी दिलेल्या अहवालाची तपासणी करून या प्रकरणात अपिलार्थी नामदेव बिसेन यांना दोषी धरत अप्पर आयुक्त डॉ. माधवी खोडे यांनी अपिलार्थ्यांची अपिल फेटाळत. अप्पर जिल्हाधिकाऱ्याने दिलेले निर्णय कायम ठेवला. त्यामुळे बिसेन हे अपात्र राहणार आहेत.

## शासकीय निवासस्थाने अधिकाऱ्यांच्या नियोजन शून्यतेमुळे धूळखात पडून

### वन संपत्तीचे कसे होणार संवर्धन : वन विभागाची डोळेझाक

**सडक अर्जुनी :–** वन कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून वनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी वन कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी तालुक्यात ठिकठिकाणी निवासस्थाने बांधली आहेत. पण तत्कालीन वन अधिकाऱ्यांच्या नियोजन शून्यतेमुळे सडक अर्जुनी तालुक्यात अनेक ठिकाणी निवासस्थाने आता मोडकळीस आली आहेत.

मागील पाच वर्षापासून सडक अर्जुनी तालुक्यातील सिंदीपार, डोंगरगाव, खजरी, जांभळी, सौंदड ठिकाणी वनरक्षकाची निवासस्थाने बांधून ठेवली आहेत. पण त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची, विजेची, रस्त्याची सुविधा न केल्याने वन कर्मचारी तिथे राहण्यासाठी गेले नाही. तत्कालीन वन अधिकारी व शाखा अभियंताच्या नियोजन शून्यतेमुळे शासनाचा तिजोरीला लाखो रुपयांचा चुना लावण्याचे काम केल्याची चर्चा तालुक्यात आहे. केसलवाडा (ग्रामीण रुग्णालयाच्या मागे) येथे चार, डोंगरगाव खजरी येथे एक, सिंदीपार येथे एक, सौंदड येथे एक येथे निवासस्थान बांधले आहेत. बांधले तेव्हापासून तिथे कोणताही कर्मचारी न राहिल्याने ते आता मोडकळीस आले आहेत. निवासस्थानाची पडझड झाल्याचे पाहावयास मिळत आहे. वनकर्मचारी राहत नसल्याने इलेक्ट्रिक फिटिंग, दरवाजे, खिडक्यांची चोरी झाली आहे.

### शासनाच्या उद्देशाला हरताळ

**सुरक्षित वनाला लागून वनरक्षकाचे निवासस्थान ठेवून वनाचे खऱ्या अर्थाने संगोपन व संरक्षण होईल हा उद्देश ठेवून शासनाने ठिकठिकाणी वन कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थाने बांधण्याची योजना आखली. पण अधिकाऱ्याच्या नियोजन शून्यतेमुळे या योजनेला हरताळ फासले जात आहे.**

### मोठ्या प्रमाणात राखीव क्षेत्र

**सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रात राखीव वन हे २६२७. ५३ हेक्टर आर क्षेत्रात असून ४४८७.३२ हेक्टर आर हे नवीन राखीव वनक्षेत्र आहे. तर ८४६०.८४ हेक्टर आर क्षेत्र हे सुरक्षित वन आहे. वनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रात सात सहवनक्षेत्र कार्यालय असून कर्मचारी, अधिकाऱ्यांचा फार मोठा लवाजमा आहे. मात्र याकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे.**



## संपादकीय

### देशभर अफुच्या गोळ्यांचं वाटप जोरदारपणे सुरू आहे!

"हिंदू –मुस्लीम" नावाची गोळी एकदम पॉवरफुल आहे. तीचा अंमल चढला की भ्रमिष्ट विचार सुरू होतात... हे भ्रमिष्ट विचार म्हणजे... "मुस्लिम हे या देशाचे शत्रू आहेत", "हिंदूंवर अन्याय मुसलमानांनीच केला", "मुसलमानांमुळे या देशाचे तुकडे झाले", मुसलमान लव्ह जिहाद करतात, मुसलमान हे आपल्या प्रगतीमध्ये अडसर आहेत, मुसलमान हे दहा–बारा मुलांना जन्माला घालतात कारण त्यांना लोकसंख्या वाढवून देश ताब्यात घ्यायचा आहे, गांधी– नेहरू यांचे पूर्वज मुस्लिम होते, वगैरे वगैरे. या अफूच्या गोळ्या खाल्लयावर अशा भ्रमिष्ट विचारांची उधळण हे नशेबाज उधळत असतात. आणि थयथयाट करत ते याच नशेत मशिदींवर हल्ला करत असतात.. त्यांच्या दुकानात जायचे बंद करा असे ओरडत असतात... शाकाहार श्रेष्ठ असे म्हणत असतात.. आणि आपला धर्म श्रेष्ठ म्हणत पळत सुटतात !

दुसरी अफूची गोळी आहे "उलट्या इतिहासाची". आज भारतात गल्लोगल्ली ते सोशल मीडियावर पोस्टापोष्टी असे सर्वत्र ही गोळी खाल्लेले इतिहासाची रोज रोज उलटी करत असतात. म्हणजे खराखुरा घडलेला इतिहास न सांगता उलटा इतिहास सांगत ते बेधुंद नशा सगळीकडे पसरवत असतात. मोबाईल घेतले की ही नशा जोरात चढते आणि सध्या आजूबाजूला काय चालले आहे इकडे संपूर्ण कानाडोळा करून इतिहासाच्या ओकाऱ्या करून त्यातच कालवत बसलेले दिसतात. असे नशेबाज हे पत्रकार देखील आहेत आणि वृत्तपत्रं देखील आहेत आणि न्यूज चॅनेल्स देखील आहेत. नशाधुंद अशा या गोळ्यांनी मोठे मोठे सिनेमे देखील उलटे सुलटे तयार केलेले आहेत. मग त्यामध्ये भारतातील खरेखुरे वास्तव हे नशेमध्ये स्वतःच्या सोयीचे तयार करून दाखवत बसले आहेत. इतिहासाच्या अफूची गोळी या देशाला विज्ञानाच्या प्रगतीकडे नेतच नसल्यामुळे सगळे चिडीचूप इतिहासातच लोळत बसलेले आहेत. या नशेमध्ये दुधापासून पेट्रोल पर्यंत खरेदी करायला वाट्टेल तितके पैसे मोजायला हे नशेबाज तयार आहेत !

तिसरी गोळी आहे "हिंदुत्वाची". ही नशेची गोळी इतकी पॉवरफुल आहे की ती खरोखर माणसाचे माणूसपणच घालवते! हिंदू नावाची गोळी थोडी सौम्य होती. ती गोळी खाऊन लोक माणसासारखे व्यवहार बऱ्यापैकी करत होते. पण आता दाढ्या वाढवणे.. गळ्यात माळा घालून नग्न हिंडणे...भगवा रंग फासणे... मंत्र पुटपुटणे... देव देव करत पळत सुटणे... मंदिरातच रोगांवर उपचार सुरू करणे... अंतिम सत्य आमचा धर्मच देणार आहे अशी आरोळी ठोकून सगळ्यांना नशेत चूर करून ठेवणे.... आणि या देशाचा धर्म हिंदुत्व आहे असे ठासून सांगणे... अशी भ्रमिष्ठासारखी बडबड सगळीकडे हे करत सुटतात! या गोळीच्या नशेमध्ये इतर सर्व धर्मांना हाकलून लावा, नष्ट करा, असले बिनडोक विचार ते पेरत असतात. जे मुस्लिमांनी सोळाशे वर्षांपूर्वी केले ते आता हिंदुत्ववादी २१ व्या शतकात करत आहेत! मुस्लिमांनी त्यावेळी या धर्मउन्मादाच्या गोळ्या खाल्लया होत्या. म्हणून आत्ता त्यांच्यासारखेच हे करू लागले आहेत. पण हिंदुत्वाच्या गोळ्या घेतलेल्यांना नशेत काहीच हे दिसत नाही की जगात कोणतेच राष्ट्र धर्माच्या आधाराने प्रगती करू शकलेले नाही. सर्व धर्मराष्ट्रांमध्ये दहशतवाद आणि भांडणांचा बुजबुजाट झालेला आहे. प्रशासन उत्तम केले तरच ते राष्ट्र प्रगत होते. जगात आज सर्वोच्च स्थानी नास्तिक राष्ट्रे आहेत. तसे पाहिले तर सर्वच धर्माच्या लोकांमध्ये अशा प्रकारच्या गोळ्या घेतलेले भ्रमिष्ट जिकडेतिकडे उच्छाद मांडून बसले आहेत !

नशेची आणखीन एक गोळी हिंदुत्वा बरोबर दिली जाते ती आहे "देश भक्ती" गोळी. आणि ही गोळी हिंदुत्वाच्या गोळीबरोबर चारली जाते. त्यामुळे हा देश हिंदुत्ववाद्यांचा आहे आणि तेच तेवढे देशभक्त आहेत असे भ्रमिष्ट विचार जिकडे तिकडे ते नाचवत फिरत असतात. जो हिंदुत्व मानत नाही ते सगळे देशद्रोही असेही डोके फिरल्यासारखे ते बडबडत असतात. भारताच्या निर्मितीपासून आज अखेर भारताने जो प्रवास केला तो हिंदुत्वाच्या नशेच्या गोळीने नव्हे हे त्यांना नशेमध्ये असल्यामुळे कळतच नाही. या देशाच्या प्रगतीसाठी सर्व धर्माचे लोक कंबर कसून उभे होते आणि त्यांनी स्वतःची आयुष्यं झोकून दिलेली आहेत. हे या नशाबाज्यांना दिसत नाही. हातात त्रिशूल घेऊन या देशाची देशभक्ती दाखवायची नसते तर विज्ञानात अफाट प्रगती करून देशाला सर्वोच्च स्थानावर नेऊन दाखवायची असते असे विचार यांच्या भेजात शिरतच नाहीत.

चौथी नशेची गोळी आहे "मोबाईलच्या सोशल मीडियाची". ही गोळी घेतली की उठल्यापासून झोपेपर्यंत रिल्स बघत एन्जॉय चाललेला असतो. आजूबाजूला काय चालू आहे याची फिकीर अजिबात या नशेबाजांना नसते. नवरा काय करतो.. बायको काय करते.. आणि मुले काय करतात.. आई बाबा काय करतात.. याची तर या नशेबाजांना कोणतीच फिकीर नसतेच पण देशाचीही नसते. देशाचा जीडीपी, (नशेबाज म्हणतात, हे काय असते भाऊ?), देशाचे पंतप्रधान इतर राष्ट्रात जाऊन देशाची वाट लावतात की सन्मान राखतात, महागाई–भ्रष्टाचार चालूच आहे, दिवसाढवळ्या मुडदे रस्त्यावर पाडणे, राजकारणात गुंडांनी वाटेल तसा हैदोस घालणे, अफू आणि ड्रग्जच्या गोळ्या उद्योगपतींच्या पोर्टवर सापडणे, सर्व मीडिया सत्ताधाऱ्यांनी खिशात घालणे, वगैरे वगैरे गोष्टी मोबाईलच्या नशेमध्ये असल्यामुळे दिसतच नाहीत. दिसल्या तरीही, 'हे काय होतच राहणार' असे बडबडत हे नशेबाज वावरत असतात.

खुद्द सत्ताधाऱ्यांनी या गोळ्यांचे वाटप प्रचंड प्रमाणात सर्व देशभर करून सत्ता मिळवल्यामुळे तेही नशेमध्ये आहेत! सारा देश जेव्हा अशा अफूच्या गोळ्यांच्या नशेमध्ये जातो तेव्हा तो देश भ्रमिष्ठांचा बनतो. कुठेही जा. कुठल्याही क्षेत्रात बघा. जिकडे तिकडे हे नशेबाज आपले भ्रमिष्ट फुत्कार काढत बसले आहेत! या गोळ्यांचा कारखाना जर असाच चालू राहिला तर जगभरात या देशाची नाचक्की चालूच राहील आणि गोळ्यांचे वाटप करणारा कारखाना आपण देश ताब्यात ठेवला या नशेमध्ये गुंगून राहील. चला या नया भारताचे आपण एकतर स्वागत करूया, नाहीतर या नशेबाज्यांना आणि नशेच्या गोळ्यांच्या कारखान्याला हुडकून काढून त्यांचा बंदोबस्त करूया...

# मराठा-ओबीसीच्या खांद्यावर कुणाचे ओझे? कसे उतरणार?

मंडल आयोग लागू झाल्यानंतर ओबीसींना आरक्षणाचा लाभ मिळू लागला. ओबीसीत समाविष्ट नसलेल्या अनेक ब्राम्हणेतर जातीसमूहांमधून आरक्षणाची मागणी प्रकर्षाने होऊ लागली. मंडल आयोग लागू झाला तेव्हा ब्राम्हणी पत्रकारिता आरक्षणाच्या विरोधात असताना आरक्षण विरोधाचा आगडोंब उसळला गेला.तद्नंतर मात्र आरक्षणाचे महत्त्व ध्यानात येऊन अनेक जाती समुह आरक्षणाची मागणी करत आलेत. देशभर आरक्षणाच्या लढ्याचा परीघ वाढत जाऊन मंडलपूर्वीच्या आरक्षण विरोधक खेम्यात आरक्षण मागणाऱ्यांची तादाद अनेक पटीने वाढू लागली.'कमंडलच्या पोटात मंडल घुसणार!' हे भाकीत खरं ठरायला फार काळ नाही दवडला! महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचाही लढा याचप्रकारे उभा राहिला. मराठा आरक्षणाच्या संदर्भातील शक्याशक्यतेतून, ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाला समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न, अर्थात मराठा समाजाचे ओबीसी करण आणि ओबीसीचा मराठा ओबीसीकरणास विरोध या घटनाक्रमात ओबीसी–मराठा वाद गत दशकात धोकादायक वळणावर पोहचला. लोकसंख्येच्या दृष्टीने मराठा आणि ओबीसी समूह समाजाचे अतिशय महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे ओबीसी–मराठा द्वंद्वात्मक स्थितीतून महाराष्ट्राचे अवघे राजकीय सामाजिक जीवन प्रभावित झाले. परिणामतः ओबीसी मराठा समाजाची अपरिमित हानी होऊ लागली आहे. यावर ब्राम्हणेतर राजकीय सामाजिक धुरीणांनी भूमिका घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा कालपरवा निकाल लागला. निकालापूर्वी जे आडाखेतडाखे बांधले जात होते, ते निकालानंतर सपशेल खोटे ठरलेत. विधानसभा निवडणुक निकालाचे विश्लेषण मांडत असताना इव्हीएम मधील हेराफेरीच्या बाबीपासून तर मराठा – ओबीसी फॅक्टर पर्यंत अनेक बाबींवर खलबते केल्या जात असली, तरी एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे ओबीसी फॅक्टर बद्दलचे विश्लेषण होय. "ओबीसी फॅक्टर चालल्याने महायुतीच्या जागा वाढून अनपेक्षित निकाल लागला," असे काही ओबीसी नेते बोलताना दिसतात. राजकीय ओबीसी मंडळीप्रमाणेच, ओबीसी चळवळीतील काही अभ्यासक, आणि मराठा राजकारणाचा मत्सर करण्यापोटी असे होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. हे विश्लेषण अचूक आहे की तद्दन प्रचारकी? याचा विचार करण्याची गरज अनेक वर्षे नेटाने आणि जिकरीने ओबीसी लढ्यात खपणाऱ्यांना उरली आहे. कारण जी ओबीसी राजकीय मंडळी निवडणूक निकालाबद्दल उपरोक्त प्रकारचे सुतोवाच करत असतात, त्यांना ओबीसी चळवळीची पार्श्वभूमी समजून घ्यावी लागेल. मुळात ज्या महायुतीला ओबीसी फॅक्टर फायद्याचा ठरला असं मानले जाते, त्या महायुतीतील मोठा भाऊ म्हणून मिरवणाऱ्या पक्षाची ओबीसी आरक्षणासंदर्भात भूमिका तपासून घेतली पाहिजे. ओबीसीचा मंडल आयोग लागू झाला त्यावेळी केंद्रात व्ही. पी. सिंग सरकार मत्याफ पक्षाच्या पाठिंब्यावर होते. मंडल आयोग लागू केला तेव्हा त्यांनी 'अडवाणींचा हनुमान' केला आणि रामरथ यात्रा काढली. केंद्र सरकार ज्या जनता दल पक्षाचे होते त्याच पक्षाच्या बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी रथयात्रा अडवून अडवाणींना अटक केली होती. रथयात्रेचा बहाणा करुन केंद्र सरकार पाडण्यात आले. रामरथ यात्रेच्या आडून ओबीसी आरक्षणाच्या विरोधात मोठी खेळी केली होती. अशा पक्षाला ओबीसी फॅक्टर फायद्याचा का ठरावा? दुसरीकडे महाविकास आघाडी मग ओबीसी विरोधात होती की, मराठ्यांच्या बाजूने ? मराठा आरक्षणाच्या बाजूने असेल तर मराठा कार्ड महाविकास आघाडीसाठी फायदेशीर ठरले का? नाही ना ? उलट महायुतीचे मराठा आणि ओबीसी अधिक उमेदवार निवडून येण्यासाठी ओबीसी–मराठा कलगीतुरा शिताफीने लावण्यात आला. अर्थात, मराठा – ओबीसी वाद जाणूनबुजून चिघळत ठेवून त्याचा फायदा उपटण्याचा कावेबाजपणा कामात आला. त्यामुळे ना ओबीसीचं भलं ना मराठा आरक्षणाची उकल. अशी वस्तुस्थिती मराठा ओबीसीच्या पदरी पडली. ओबीसीचा नेता म्हणून ज्यांना झाडावर चढवले त्यांना पटकणी मिळाली. कोणता राजकीय लाभ ओबीसीला झाला? ५२? ओबीसीचा मुख्यमंत्री व्हायचे तर सोडाच, ओबीसीसाठी लढणारे तरी आमदार मंत्री किती असतील याचा शोध घेण्याची तसदी घ्या. आता कायदेशीर मराठा आरक्षण, ओबीसीची जातीनिहाय जनगणनेची मागणी आणि मराठा– ओबीसींच्या इतरही अनेक समस्या पूर्ण करण्यासाठी राज्य शासन काय भूमिका घेणार? केंद्रात याच पक्षाची सत्ता असून जातीनिहाय जनगणना करणार नसल्याचे खुलेआम सुतोवाच केले आहे. मखोटं बोला पण रेटून बोलाफ असा ज्यांचा चेहरा त्यांच्याबद्दल अजून फार काही सांगण्याची आवश्यकता नाही! निवडणुका संपल्या आता आश्वासनं पण विस्मृतीत जातील. तसेही



निवडणूक जाहिरनामा प्रकार लोकलुभावण घोषणांसारखा वापरायचा असतो, अशीच दंडेली जणू रुजवली जात आहे आणि त्या आश्वसनांबद्दल जाब विचारणार कोण?

मराठा – ओबीसी वाद जसा आरक्षण विरोधकांच्या पथ्यावर पडला, किंबहुना ओबीसींच्या बाबतीत हमेशा असेच होत असते. ओबीसी किंवा ब्राम्हणेतर अन्यायी व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवायचा प्रयत्न करते तेव्हा त्यांची 'कॉंग्रेसी' म्हणून संभावना करुन मुद्दाम व्यवस्थेतील अन्याय्य तत्वावर पडदा पाडण्याचे ब्राम्हणी षडयंत्र रचलेले असतात. ओबीसी अस्मिता जागृत होऊन ओबीसी हक्काची लढाई सुरू होते तेव्हा हिंदू एकता धोक्यात येत असल्याची आवई उठवली जाते. ज्या जातीय चौकटीत ओबीसीवर अन्याय झाला, त्या अन्यायकारक व्यवस्थेची जेव्हा चिकित्सा होते, तेव्हा त्यांना नास्तिक, धर्मद्रोही ठरवून टीकेचे लक्ष्य केले जाते आणि काही ओबीसींनाच बिभीषणाचे सोंग देऊन ओबीसींच्या हक्कांसाठी लढाई लढणाऱ्या विरोधात पेचवले जाते, अर्थात ओबीसींच्या खांद्यावर बंदूक ठेवून कधी मराठा निशाना तर, मराठा खांदा वापरुन कधी ओबीसी लक्ष्य केले जातात. सामाजिक संदर्भात जात वास्तव समजून घेताना ओबीसीचे जे स्थान आहे त्यापेक्षा मराठा आणि ब्राम्हणेतरांचे वेगळं स्थान फार काही दिसत नाही. हे चित्र बदलले पाहिजे असं मनापासून इच्छिणाऱ्या ओबीसी मराठा भावंडांनी ब्राम्हणेतरांचा ऐतिहासिक लढा समजून घ्यावा लागेल. महाराष्ट्र ही क्रांतिकारकांची भूमी आहे. महात्मा फुल्यांनी महाराष्ट्रात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि स्त्रिशुद्रातिशुद्रांना स्वयंप्रकाशी होण्याची दिशा प्राप्त झाली. वर्ण–जातीय चौकट मोडून अत्याचारी ब्राम्हणी धर्मग्रंथातील मतलबीपणा चिकित्सक पद्धतीने उघड करुन स्त्रिशुद्रातिशुद्रांना अब्राम्हणी परंपरेकडे बघण्याची ऐतिहासिक दृष्टी प्राप्त झाली. सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेतर राजकीय आघाडीने राजकीय सामाजिक वास्तव ध्यानात घेऊन लोकजागृती केली, शिक्षणाचे महत्त्व प्रचार प्रसार करण्यासाठी प्राधान्याने झटून, जातीयता, शेतकरी कष्टकरी जनतेचे सावकारी शोषण, मतलबी ब्राम्हणी धर्मरुढी आधारित शोषण ब्राम्हणी पुरोहितशाहीची लक्तरे काढत परखड भूमिका मांडली. लोकप्रबोधनाच्या माध्यमातून ब्राम्हणेतर समाजाने सामाजिक राजकीय शैक्षणिक सहकार अशा महत्वपूर्ण क्षेत्रात मुसंडी मारली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला उच्चजातींचा झालेला विरोध, राजर्षी शाहू महाराजांचा वेदोक्त प्रकरणात पुरोहितशाहीकडून झालेला अपमान या घटनांचे पडसाद पडून ब्राम्हणेतर अस्मिता जागी होऊ लागली. जातउतरंडीत स्त्रिशुद्रातिशुद्रांचे दुय्यम स्थान याविरोधात सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळीत मराठा–ओबीसी कसे हातात – हात घालून लढले, आणि ब्राम्हणेतरांचा लढा बलाढ्य व्यवस्थेच्या विरोधात लढण्यासाठी ब्राम्हणेतरांच्या एकीचे बळ सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळीसाठी फार महत्त्वाचे ठरले. सत्यशोधकी विचारसरणीचा झंझावात त्यामुळेच महाराष्ट्रात कानाकोपऱ्यात लोकचळवळ बनून पोहचू शकला. मराठा–माळी आदी अठरापगड ओबीसी भटक्या दलित जातींच्या सहभागाने राजकीय सामाजिक शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातील अनेक मोक्याच्या जागांपर्यंत पोहचता येते. हे दिसून आले. सत्यशोधक चळवळीतील दुसरी पिढी जास्त जोमाने काम करत असताना सामाजिक आणि राजकीय एकोप्याने खूपच आश्वासकपणे सकारात्मक परिणाम दिसून येतात. बडोदावत्सल सयाजीराव गायकवाड महाराज आणि करवीर संस्थानाचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी यासंदर्भात घेतलेली भुमिका आजही ब्राम्हणेतर राजकीय मुखंडांना प्रेरणादायी ठरते. सयाजीराव गायकवाड यांनी सावित्रीबाई फुले यांना वृद्धापकाळात दिलेली पेंशन,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेली मदत हे सर्वश्रुत आहेच. सत्यशोधक चळवळीचे अनेक कार्यकर्ते पूर्णवेळ काम करत, सत्यशोधकी विचारसरणीचा प्रचार करत, पुस्तक काढत, विविध ठिणाहून नियतकालिके चालवत त्यासाठी छापखाना उभा करणे, सातत्याने प्रवास करून चळवळीत जिवंतपणा ठेवणाऱ्या लेखक, पत्रकार, कलावंत पुढाऱ्यांना यासाठी मदत अर्थसहाय्य, अभय देण्याचे काम केले. सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांना उच्चजातीय जाचक तत्वांशी सामना करत असताना सामाजिक चळवळीची अपरिहार्यता ध्यानात आली होती. म्हणून राजकीय सामाजिक एकजूट होऊन, ब्राम्हणी जातवर्चस्ववादी शक्तीशी दोन हात करत स्त्रीशुद्रातीशुद्रांची हितवर्धक सत्यशोधक चळवळ लोकचळवळ ठरली. बडोदावत्सल सयाजीराव आणि राजर्षी शाहू महाराज लोकराजे ठरलेत.तो वारसा वर्तमान काळात कुठे लक्षात घेतला जातो. सामाजिक चळवळी ज्या विषम व्यवस्थेशी लढून धर्मांध शक्ती विरोधी जनमत तयार करण्याचे काम करतात, त्यांना बळ देण्याची भूमिका धर्मांध राजकीय शक्ती विरोधात लढणाऱ्या किती राजकीय पक्षांची आणि राजकीय नेतृत्वाची आहे? सद्यस्थितीत राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचा विचार करता या बाबतीत अधिक गंभीरपणे समस्त राजकीय – गैरराजकीय ब्राम्हणेतर म्होरक्यांनी भूमिका घेण्याची नितांत आवश्यकता आहे. अस्तित्वाची लढाई समजून

ब्राम्हणेतरांच्या राजकीय सामाजिक एकीची अपरिहार्यता आणि अलिकडे मराठा–ओबीसी वादामुळे परस्परांबद्दल अविश्वास यावर गांभीर्याने लक्ष केंद्रित होणे फार आवश्यक झाले आहे.

सत्यशोधक चळवळीच्या भरभराटीच्या काळात सकल महाराष्ट्र भूमी अपुरी पडून गुजरातेतील बडोदा – व्हाया बेळगाव कर्नाटक – तामिळनाडू दक्षिण भारतात ब्राह्मणेतर लढा उदंड झाला. मंडलनंतरच्या काळात ओबीसी लढ्याच्या विस्तारात मधला जाती तबका ओबीसी अस्मितेच्या जागृतीतून उभारी घेत असताना साहित्याच्या माध्यमातूनही व्यक्त होऊ लागला. ओबीसी मधील जात वास्तव त्यातून राजकीय – सामाजिक भान येऊन अनेक जात संघटना ओबीसी अंतर्गत लढ्यातून सक्रिय होऊन जातीयता, विषमता आणि आरक्षणाची निकड ऐरणीवर येऊ लागली. दरम्यान मराठा आरक्षणाची मागणी, त्यासाठी निघालेले सकल मराठा समाजाचे मोर्चे, मराठा–ओबीसी वादातून झालेली खडाजंगी, मराठा,मुस्लिम ओबीसी आरक्षणाचा पेच आणि जातिनिहाय जनगणनेची मागणी जोर धरत असताना राजकीय धुरीणांनी या सर्व समाज घटकांमध्ये आपापसात आग लावून राजकीय पोळी शेकली गेली, ही चर्चा जिव्हारी लागणारी आहे. मराठा ओबीसी यांच्यात कमालीचा शत्रुभाव पेरण्याचे काम आरक्षणाच्या उकल न केलेल्या तिढ्यामुळे होऊ लागले. त्यातून जातीय तेढ आणि सोमनाथ सूर्यवंशी व संतोष देशमुख यांची हत्या ही प्रकरणं महाराष्ट्र राज्याच्या प्रतिष्ठेला कलंक ठरलीत. आरक्षणाच्या विरोधक सत्ताधाऱ्यांनी मराठा – ओबीसी आरक्षणाचा पेच न सोडवल्याने त्याचे रुपांतर सामाजिक संघर्षात झाल्याचे उघड होऊ लागले. आरक्षणासाठी एकिकडे सातत्याने मराठा आंदोलकांची उपोषण सत्रं चालू आहेत. ओबीसी प्रवर्गातून मराठा आरक्षण देण्यात यावे ही मागणी आहे. तर आधीच महाराष्ट्रात ओबीसीचे आरक्षण कमी कमी होऊन ५२ टक्के ओबीसीला १९ ? वर आणले गेले आणि ओबीसीत मराठा समाज समाविष्ट झाल्यास ओबीसीवर अन्यायकारक ठरेल,म्हणून ओबीसी उद्विग्न होणे आणि मराठा आरक्षणासाठी आग्रही असणे ह्या घटना क्रमात जातीजगणना करण्याशिवाय गत्यंतर नाही ही मागणी जोर धरू लागली.ओबीसी मराठा आरक्षणाचा तिढा सोडविण्यासाठी जातीजनगणेची मागणी आता संसदेतही घुमू लागली आहे. पण सामाजिक लढ्यातून मराठा–ओबीसी तसेच ओबीसी मराठा मुस्लिम एकजुट झाल्याशिवाय, सामाजिक दुही माजवणाऱ्यांना थोपवणे शक्यही होणार नाही. हे आजचे राजकीय सामाजिक वास्तवही ध्यानात घ्यावे लागेल.

**अनुज हुलके**

### जलसंपदा विभागाच्या वतीने जलजागृती प्रभात फेरीचे आयोजन

**गोंदिया,** : जलसंपदा विभाग, गोंदिया यांच्या वतीने जलजागृती सप्ताह अंतर्गत जलजागृती प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रभात फेरीस जलसंपदा विभाग अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग–गोंदिया, गोंदिया पाटबंधारे विभाग व त्याअंतर्गत सर्व उपविभाग, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग– गोंदिया व त्याअंतर्गत सर्व उपविभाग, मध्यम प्रकल्प पाटबंधारे विभाग– गोंदिया विभाग व त्या अंतर्गत सर्व उपविभाग, मृद व जलसंधारण विभाग– गोंदिया, लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद गोंदिया, धापेवाडा उपसा सिंचन विभाग तिरोडा, महाराष्ट्र प्राधिकारी विभाग गोंदिया व इतर विभाग/उपविभागतील अधिकारी व कर्मचारी तसेच एस.एस. गर्ल्स माध्यमिक शाळा, राजस्थान कन्या महाविद्यालय, आदर्श सिंधी शाळा व इतर शाळा, गोंदिया जिल्हा तायक्वांदो असोसिएशन, सशक्त नारी संस्था, आंचल बहुउद्देशीय संस्था व इतर असोसिएशनचे सदस्य यांचा ऊत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नागरिकांनीही या सामाजिक उपक्रमात सहभाग घेतला.

# शेतकरी कुटुंबाच्या आत्महत्येची सत्यकथा! "१९ मार्च सहवेदना अन्नत्याग दीन"

जगाच्या पाठीवर दाता असेल, तर तो फक्त एक शेतकरीच आहे. आणि तोच खरा प्रामाणिकपणाने कष्ट करून सोन्यासारखे धान्य पिकवून जगाला पोसतो. म्हणून त्याला अनेक उपाध्या मिळाल्यात ? बळीराजा, पोशिंदा, कैवारी, अन्नदाता. शेतकरी राजा, या सर्व उपाध्या सरकारी भाषेतील आहेत. कारण त्यांनीच धोरणे राबवून शेतकरी हा गुलाम व लाचार करून ठेवला. त्या गुलामाला लाचारीची वेदना व जाणीव होऊ नये म्हणून, त्याला हरभऱ्याच्या झाडावर चढविले जाते, हीच वस्तूस्थिती आहे. शेतीमालाला भाव न देता अनेक योजनांचे गांजर दाखवून बेवकूफ बनविले जाते. सरकारच्या चुकीच्या धोरणाने १९ मार्च १९८६ रोजी महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाची, इज्जत घालवणारी विदर्भातील पहिली सहकुटुंब शेतकरी आत्महत्या दत्ताधाम (पवणार) येथे झाली. भयानक सुन्न करणारी, मनाला तळफडविणारी ती घटना होती. भारत देशातील जनसामान्यांचे मन ढवळून निघेल अशी ही क्रूर सत्यकथा होती. कुटुंबातील आदर ,प्रेम , व नवीन उमलणाऱ्या कोवळ्या जिवाचा नाश करणारी ती एक शोकांतिका होती. आणि अशा घटना आजही भारत देशात घडतात शेतकऱ्यांचे दुर्भाग्य आहे ?

स्व. साहेबराव पाटील करपे हे स्वतः व त्यांचे कुटुंब (दोन मुली मंगला व सारिका आणि एक मुलगा भगवान) यांना अंदाजे १५० कि.मी. चा प्रवास करून विनोबा भावे यांच्या आश्रमाजवळ, दत्तापूर धाम पवनार येथे रात्रीला मुक्कामी गेले. तेव्हा त्यांनी शासनाच्या " शेतकरी विरोधी धोरणाचे संदर्भात सुसाईड नोट म्हणून ,एक सरकारला पत्र लिहिले आणि शेतकरी म्हणून जगणं कठीण झाले, असे नमूद केले होते" . ते पत्र म्हणजेच शेतकरी समाजाच्या जगण्याची अंतिम कहाणी होती. शेतकरी हा काबाडकष्ट करून, रात्रीच्या अंधारात उत्पादन वाढवून जगाला पोसतो आहे, आणि शासन शेतकऱ्यांची दुर्दशा अवहेलना व टिंगलबाजी करीत आहे. त्या व्यक्तीने स्वतःचे दुःख पचवून रात्रीचे जेवणात विषारी औषधाचे भजे स्टोव्हवर कढईत काढून (आई, एक मुलगा, दोन मुली) सर्वांनी एकत्रित सेवन केले व जीवनाची अंतिम कहाणी संपविली. साहेबराव पाटील करपे हे साठ एकर शेतीचे मोठे मालक होते. कधीकाळी ते शेती विकून प्रपंच चालवीत होते. त्याच वर्षी त्यांनी शेतामध्ये दहा एकर गव्हाची पेरणी केली होती. गव्हाच्या दाणेदार उम्ब्या भरनार होत्या, आणि शेवटचे पाणी गव्हाला देऊन, गव्हाचे उत्पादन वाढवून पिके काढावी, व अंगावर असलेले कर्ज फेडावे. अशा विचारात मग्न असताना, घरात दोन तरुण मुली लग्नाच्या होत्या. मुला – मुलीचे लग्न करून आता कर्ज फेडावे, हा दुःखाचा डोंगर त्यांच्या डोळ्यासमोर दिसत होता. शेतीमालाला भाव कमी मिळत असल्यामुळे सतत कर्जाचा डोंगर डोक्यावर वाढत होता. ते एक सुशिक्षित शेतकरी होते.

स्व. साहेबराव पाटील हे चिलगव्हाण या गावचे माजी सरपंच होते. एका प्रतिष्ठित घराण्यात जगत असताना त्यांचा साधारण अर्धा एकराचा मोठा वाडा होता. आता त्या वाड्यात इतर बाहेरील तीन कुटुंब आता रहिवासी आहेत. त्यांच्या शेतातील इलेक्ट्रिक ऑफिसने पाणी देणाऱ्या गव्हाची वीज कापली व त्यांनी माझ्या शेतातील गव्हाची दाणेदार उंब्या भरलेली वीज कापू नका, मी गव्हाचे पीक आल्यावर इलेक्ट्रिक बिल भरून देईल, विद्युत मंडळाला विनंती केली होती. त्यांच्याजवळ वीज बिलाचे पैसे भरण्यासाठी नव्हते, म्हणून ते सतत विचारात होते. परंतु हे महाराष्ट्र सरकारच त्यांच्या जगण्याचा अंत पाहत होते. वीज बिल भरल्याशिवाय तुम्हाला पाणी देता येणार नाही?, अशी शासनाने अडवणूक केली. शासनाच्या या आडमुठ्या धोरणाचा साहेबराव पाटील यांना फार पश्चाताप झाला. शासनाने आपली इज्जत पणाला लावली, याचे अतोनात दुःख झाले. वीज कापल्यामुळे व गव्हाचे पीक डोळ्यासमोर सुकत होते, झालेल्या बेइज्जतीला ते घाबरून गेले. राहत्या गावातील झालेली बेइज्जत त्यांच्या मनाला वेदना व धक्का देणारी होती. शेवटी त्यांनी आपण गेल्यावर आपल्या कुटुंबाचे कसे होईल? म्हणून संपूर्ण कुटुंबास आत्महत्या करण्याची परिस्थिती त्यांना खुणावत होती,



त्यांनी ही वेदना पत्नी मालतीताईना बोलून दाखविली कारण ती एक अतिशय संवेदनशिल कौटुंबिक आत्महत्या होती. त्यांनी दिलेल्या पत्रात सुसाईड नोट मध्ये शासन आमच्या आत्महत्याची दखल घेऊन, शेतकरी समाजासाठी काहीतरी ठोस निर्णय घेतील काय ? असा आशावाद व्यक्त केला होता.

तो दिवस म्हणजेच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा सहवेदना दिन १९ मार्च १९८६. जेव्हा पवणार येथून आत्महत्या केलेल्या खोलीतून पाच प्रेते बाहेर काढण्यात आली व एकाच गाडीत त्यांच्या मूळ गावी आणण्यात आली. ही गोष्ट वाऱ्यासारखी संपूर्ण देशात पसरली. कारण ती शेतकऱ्यांच्या दुःखावर मीठ चोळणारी बातमी होती. शेती आणि शेतकरी व्यवस्थेवर घाला घालणारी एक सत्य कथा होती.

चिलगव्हाण हे महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशाच्या सीमेला लागून असलेल एक छोटसं खेडेगाव आहे. यवतमाळ जिल्ह्यात ,महागाव तालुक्यामध्ये चिलगव्हाण हे सामूहिक संपूर्ण कुटुंबासहित, पहिली शेतकरी आत्महत्येचे स्थळ आहे. शेतकरी विरोधी धोरणामुळे, कसा शेतकऱ्यांचा बळी जातो, याचे जिवंत उदाहरण होते? या गावातील शेतकरी स्व. साहेबराव पाटील करपे यांनी स्वतः आपल्या हाताने मुलाबाळांना विष देऊन दत्तधाम पवणार वर्धा नदीच्या तीरावर सर्व कुटुंबाची जीवन यात्रा संपवीली. एवढी मनाला संतप्त वेदना देणारी ही क्रुर आत्महत्या होती. सरकारचे विचित्र धोरणामुळे कसा शेतकरी संपविल्या जातो. हे या आत्महत्याने संपूर्ण देशाचेच नाही तर जगाचे लक्ष वेधले आहे? शेतकऱ्यांच्या आजही दुःखाच्या भावनेचा अंत, चुकीचे कायदे राबवून घडविल्या जाते. यापेक्षा शेतकऱ्यांचे दुर्भाग्य असूच शकत नाही? एकत्रित कुटुंबाची आत्महत्या ही संपूर्ण देशालाच नव्हे तर जगाला लाजविणारी आत्महत्या होती. त्याचवेळी वर्धा येथील शेतकरी कार्यक्रमा निमित्त वास्तव्यास असलेले सर्व शेतकरी नेते पवनार येथे धावून गेलेत.

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी त्यावेळी " शासनास गर्भित इशारा दिला होता की, दखल घ्या व धोरणे बदलवा अन्यथा रोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतील." परंतु ४० वर्षानंतर सुद्धा अजूनही शेतकरी आत्महत्या थांबलेल्या नाहीत. त्या निमित्त शेतकरी बांधव व महिला एकत्र येवून सामूहिक एक दिवसाचा अन्नत्याग उपोषण करनार आहेत. आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना श्रद्धांजली वाहतील. शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध करनार आहेत. मूळ संविधानामध्ये १८ जून १९५१ ला पहिली घटना दुरुस्ती करून, परिशिष्ट नऊ मध्ये जवळपास शेतीशी संबंधित २५० शेतकरी विरोधी कायदे तयार केलीत. जीवनावश्यक वस्तू कायद्यामध्ये शेतकऱ्यांचे पिके घेतली. शेतीमालाच्या भाव वाढीवर बंधने आनलीत. त्यामुळे शेतीमालाला भाव मागणे हे गुन्ह्याच्या स्वरूपात आले. केंद्र शासनाने मागील ७५ वर्ष कॉंग्रेस व बीजेपी या सरकारने जुनी धोरणे राबवुन डॉ. आंबेडकरांचे मूळ संविधानात ७५ वेळा दुरुस्ती केली, असे स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात सांगितले. राजकीय पक्ष चालवण्याच्या उद्देशाने व स्वतःच्या राजकीय फायद्याचे कायदे करून हा देश चालविल्या जात आहे. त्याचाच परिणाम शेतीमालाला भाव नाही. कॉंग्रेस व बीजेपी हे दोन्ही राजकीय पक्ष भांडवलदाराचे पक्ष असल्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळणे हे आता दुरापास्त झाले आहे. तरीपण काही अशिक्षित शेतकरी त्याच राजकीय पक्षाला डोक्यावर घेऊन नाचत असल्यामुळे ही लढाई अतिशय अडचणीची व बेताल होत आहे. सर्व देशातील शेतकऱ्यांनी विरोधी कायदे रद्द करण्यासाठी एकत्र यावे. व देशात बदल घडवावा, यासाठी १९ मार्च हा सहवेदना दिवस संपूर्ण देशात पाळला जातो. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात ठिकठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.गेल्या पाच वर्षा अगोदर धनंजय पाटील काकडे, ज्येष्ठ साहित्तिक व कवी राजेंद्र सोनवणे पुणे, पुरुषोत्तमराव गावंडे आर्णी, राजीव बसर्गेकर व इतर शेतकरी नेते यांनी वस्तुस्थितीचे अवलोकन करण्यासाठी चिलगव्हाण येथील कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी, भेट दिली होती. महाराष्ट्र हादरवून टाकणाऱ्या साहेबराव करपे कुटुंबाच्या सामूहिक आत्महत्तेस १९ मार्च २०२५ रोजी ३९ वर्षे पूर्ण होत आहेत . तेव्हापासून आतापर्यंतच्या कालखंडात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. परंतु शासनाचे पक्ष प्रतिनिधी, आमदार–खासदार, लोकसभा व विधानसभेत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण , करून शेतकरी आत्महत्या होणार नाही, याची ग्वाही देत नाही. त्यांच्यासाठी उपाययोजना करावी असा ठराव आजही करण्यात येत नाही.

शेतकऱ्यांच्या हक्क, न्याय व अधिकारासाठी सतत कायदेतज्ञ श्री सुभाषजी खंडागळे, शेतकरी नेते श्री धनंजय पाटील काकडे, श्री रघुनाथदादा पाटील, श्री अमरजी हबीब, कालिदास आपेट, शिवाजीनाना नांदखीले ही सर्व शेतकरी नेते मंडळी आंदोलने करून, आतापर्यंत सतत राज्य पातळीवर व देश पातळीवर सतत पाठपुरावा करीत आलेली आहे. व इतर शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी, सहकाऱ्यानी सुद्धा महाराष्ट्रात चळवळ राबवून आवाज उठविला आहे. शेतीमालाला भाव हमीभावापेक्षा पण कमी मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांनी आता स्वतःचे हक्कासाठी राजकीय निर्णय घेऊन, मतदान करण्यात यावे. आता स्वतः निर्णय घेऊन मतदान बदलावे लागेल. तसेच आता निव्वळ शेतीवर असणाऱ्या शेतकऱ्याची संख्या सुध्दा झपाट्याने कमी होऊन , घटत आहे. सरकारी वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी १८ हजार रुपये दिले जातात, तेवढा खर्च तरी शासनाने शेतकऱ्यांचा भरून काढावा. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा कलंक मिटवीण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढील लढाईसाठी सज्ज रहावे. त्यासाठी अनेक अनुदानित योजना काही दिवस बंद ठेवून, शेतकऱ्याच्या शेतीमालाला भाव द्यावे. तसेच चिलगव्हाण येथे स्व .साहेबराव पाटील करपे व मालतीताई करपे यांच्या कुटुंबाचे स्मारक व्हावे. आत्महत्या केलेल्या कुटुंबांच्या स्मरणार्थ सहभागी होण्यासाठी १९ मार्च २०२५ बुधवारला कार्यक्रम डॉ पंजाबराव देशमुख यांच्या पुतळा जवळ, पंचवटी चौक, अमरावती येथे सामूहिक उपवास दिन, सकाळी ९.०० वाजता पासून, दुपारी ३ वाजेपर्यंत केल्या जात आहे. या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त संख्येने शेतकरी बंधू–भगिनींनी उपस्थित राहावे. त्यानंतर तिथेच सहवेदना दिनाचा समारोप होईल.

**जय बळीराजा.... जय हिंद.**
**धनंजय पाटील काकडे ,**
**९८९०३६८०५८.**

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# टायगर कॉरिडॉरमधील वृक्षतोडीला परवानगी

## चौकशीची मागणी : वन विभाग व भूमी अभिलेख कार्यालयाचा निर्णय

**नवेगावबांध:-** नवेगावबांध वनपरिक्षेत्रातील कवठा परिसरातील टायगर कॉरिडॉरमधील गट क्रमांक १३ मध्ये सुमारे ८०० हून अधिक मौल्यवान वृक्षतोडीला परवानगी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे परिसरातील जैवविविधतेवर मोठा परिणाम होण्याची भीती निर्माण झाली असून, स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि तन्यज्जीत संरक्षकांकडून तीन संताप व्यक्त करण्यात येत आहे.

एकीकडे वृक्ष लागवडीवर भर दिला जात असताना दुसरीकडे जंगलातील वृक्षांची कत्तल केली जात असल्याचे आदेश काढण्यात जाल्याचे पाहून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. वन विभाग आणि भूमी अभिलेख विभागाने आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठीच ही परवानगी दिली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विशेष म्हणजे, या परिसरात यापूर्वी देखील वृक्षतोडीचा प्रस्तात नाकारण्यात आला होता. तत्कालीन वनाधिकारी ठक्कर यांनी ही जागा टायगर कॉरिडॉरमध्ये येत असल्याने वृक्षतोड अयोग्य असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, सध्या वनविभाग आणि भूमी अभिलेख विभागाच्या संमतीने ही तोड मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोक्यात सापडली आहे.

पर्यावरणतज्ज्ञांच्या माहितीनुसार, या वृक्षतोडीत सागवान, येन, आवळा, मोह यांसारख्या नैसर्गिकरीत्या वाढलेल्या औषधी व मौल्यवान वृक्षांचा समावेश आहे. ही झाडे कोणी लावलेली नसून, परिसरातील नैसर्गिक परिसंस्थेचा अविभाज्य भाग आहेत. वृक्षतोडीमुळे वन्यप्राण्यांच्या वावरात अडवळा निर्माण होणार असून, जलस्रोतांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. कारण या भागात दोन नैसर्गिक नाले असून, पावसाळ्यात पाण्याचा मोठा प्रवाह याच मार्गाने वाहतो. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, आर्थिक हितसंबंध जपण्यासाठीच ही वृक्षतोड मंजूर करण्यात आली आहे. याठरून तनविभाग कोणती भूमिका घेतो आणि नागरिकांच्या तीव्र मागण्यांनंतर प्रशासन काय निर्णय घेते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

### एकीकडे वृक्ष लागवड दुसरीकडे वृक्षतोड

**शासनाकडून पर्यावरण संरक्षणाच्या नावावर एकीकडे वृक्ष लागवड करण्यासाठी मोहीम राबविली जाते. तर आता दुसरीकडे मात्र जंगलातील वृक्षांची कलल करण्याचे आदेश काढने आत आहे. शामनाचा या निर्णयामुळे मात्र नागरिकांत रोष आहे.**

### राखीव जंगलात खासगी शेती आलीच कशी?

**पर्यावरण प्रेमींनी राखीव जंगलाच्या मध्यभागी खाजगी शेतीचा तुकडा अस्तित्वात आला कसा? असा सवाल उपस्थित केला आहे. जर ही जागा पूर्वी जंगल क्षेत्रात मोडत होती, तर तिला खासगी मालकी कशी मिळाली? आणि जर खासगी शेतजमीन असली, तरीही इतक्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यास वन विभागाने गतिमान परवानगी का दिली? असा सवाल नागरिकांनी केला आहे. स्थानिक नागरिक आणि पर्यावरणसंरक्षक संघटनांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. वन विभागाने पारदर्शकता ठेवत संपूर्ण प्रकरणाबाबत स्पष्टीकरण द्यावे आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, असे पर्यावरण कार्यकत्यांचे म्हणणे आहे.**



**या प्रकरणी संरक्षित (प्रोटेक्शन) आरएफओंचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल. तत्पूर्वी, ही वृक्षतोड तत्काळ श्रचिवण्याच्या सूचना क्षेत्र सहायक व आरएफओ नवेगाव बांधा यांना देण्यात आल्या आहेत. जंगल संरक्षणाच्या दृष्टीने हा अहवाल अत्यंत महत्त्वाचा असून, त्यामध्ये जंगलतोड, ठन्यत्रीच संरक्षक्षण, अवैध शिकार तसेच वन्यजीव कायद्याच्या उल्लंघनासंबंधी तपशील नमूद असतो. त्यामुळे, संबंधित अहवाल प्राप्त होताच पुढील आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. वनसंपत्तीचे संरक्षण हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असून, अशा प्रकारच्या घटनांवर कठोर पावले उचनानी आतील,**

**अविनाश मेश्राम, प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी**

**काली माती हनुमान मंदिर मागील जंगल सदृश परिसरातील वृक्षतोड ही मोठ्या प्रमाणात असून एकूण ८०० झाडांची कत्तल म्हणजे पर्यावरणाची मोठी हानी आहे. येथील वन्यप्राण्यांकरिता मोठी हानी आहे व ती या वृक्षतोडीमुळे भरून निघणे शक्य नाही. एकीकडे शासनाकडून वृक्षतोड मनाई केली जात असताना मोठी व वयोवृद्ध झाडे या ठिकाणी सर्रास कापली जात आहेत. या वृक्षतोडीचा निश्चितच पर्यावरणावर अनिष्ट परिणाम होणार आहे. म्हणून या वृक्षतोडीची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी**

**- विजय डोये, पर्यावरण प्रेमी**

पर्यावरण आणि कन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने या वृक्षतोडीविरोधात तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत पर्यावरणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

# २६ दिव्यांगांना लावले कृत्रिम अवयव

## ८५ दिव्यांगांनी केली कृत्रिम अवयवांची मागणी : ६० दिव्यांगांना लावणार अवयव

**गोंदिया:-** जिल्हा पोलिस दादालोरा खिडकी योजनेंतर्गत मोफत कृत्रिम अवयव शिबिराचे आयोजन दि. १५ मार्चपासून पोलिस मुख्यालयातील प्रेरणा हॉल येथे करण्यात आले आहे. यात दि. १५ मार्च रोजी २६ दिव्यांग व्यक्तींना हात व पाय असे कृत्रिम अवयव लावण्यात आले आहेत, तर १७ मार्चपर्यंत शिबिर असून, उर्वरित ६० दिव्यांगांना कृत्रिम अवयव लावून देण्यात येणार आहेत.

पोलिस दादालोरा खिडकी योजनेंतर्गत जिल्हा पोलिस दलद्वारे आयोजित रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३०३०, रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊन टाऊन, महावीर सेवा सदन आणि ह्युमॅनिटी फाउंडेशन यांच्या संयुक्तच्या वतीने अतिसंवेदनशील नक्षलग्रस्त भागातील जनतेच्या कल्याणाकरिता कायम अग्रेसर राहून विविध कल्याणकारी नावीन्यपूर्ण उपक्रम वेळोवेळी राबविण्यात येत आहेत. त्याच्याच एक भाग म्हणून पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील गरजू दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात व पाय लावून त्यांच्या साह्याने त्यांना समाजात वावरता यावे या दृष्टीने दि. १५ मार्च रोजी गरजू दिव्यांग व्यक्ती करिता तीन दिवसीय मोफत कृत्रिम अवयव शिबिराचे आयोजन पोलिस मुख्यालय कारंजा, गोंदिया येथील प्रेरणा हॉल येथे करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला पोलिस अधीक्षक गोरख भामरे, वेल्फेअर कमिटी नॅशनल डिस्ट्रिक्ट ३०३० चे चेअरमन राजीव वरबे, रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊन टाउन सचिव मृदुला सुदामे, संचालक दीपाली दोडके, माउली सेवा मित्रमंडळाचे अध्यक्ष सुहास खरे, महावीर सेवा सदन आणि इंडिया ह्युमालिटी फाउंडेशनचे डॉ. एस. एस. प्रभाकर उपस्थित होते. मोफत कृत्रिम अवयत शिबिरात उपविभागीय पोलिस अधिकारी विवेक पाटील, प्रमोद मडामे, नक्षल प्रोपोगंडा सेलचे प्रभारी अधिकारी व अंमलदार सहकार्य करीत आहेत.




# पंचवीस वर्षांनंतरही कारागृहाचा 'तुरुंगवास' संपेना !

## जमीन हस्तांतरणाला एक तप : पोलिस महासंचालक कार्यालयातच फाइल

**गोंदिया :-** गोंदिया जिल्ह्याच्या निर्मितीला २५ वर्षे पूर्ण झाली, मात्र अद्यापही येथे स्वतंत्र कारागृह नाही. अनेक वर्षांच्या मागणीनंतर, २०११ मध्ये गोंदियात कारागृह उभारण्याच्या हालचाली सुरु झाल्या. शासनाने २०११-१२ मध्ये मवर्ग एकफ श्रेणीच्या कारागृहाला मंजुरी दिली, मात्र अनुदान मागणीसाठीची फाइल पुढे सरकलीच नाही. स्वतंत्र कारागृहाअभावी जिल्ह्यातील आरोपींना ६० किमी दूर भंडारा कारागृहात हलवावे लागते.

भंडारा जिल्ह्याच्या तुलनेत गोंदिया जिल्ह्यात गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आहे. महिन्याकाठी सुमारे १५० हून अधिक

आरोपींना भंडारा येथील कारागृहात हलवावे लागते. यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ तसेच वाहनांची व्यवस्था करावी लागते. त्यासाठी लागणाऱ्या इंधनाचा खर्च वाढतो. गोंदियातील आरोपींना भंडारा येथे नेत असताना, कुणी आरोपी पसार होऊ नये किंवा आत्महत्येचा प्रयत्न करू नये यासाठी पोलिसांना विशेष दक्षता घ्यावी लागते. काही प्रकरणांमध्ये आरोपी पळून गेल्याने संबंधित पोलिस कर्मचारी निलंबित होण्याच्या घटना घडल्या आहेत. या सर्व अडचणींचा विचार करता गोंदियात स्वतंत्र कारागृहाची गरज आहे. शासनाने २०११-१२ मध्ये गोंदियात मवर्ग एकफ कारागृह उभारण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. त्यानंतर भंडारा जिल्हा कारागृह कार्यालयाने जागेच्या निवडीसाठी हालचाली सुरू केल्या. मात्र, अधीक्षक बदलल्याने प्रस्ताव प्रलंबित राहिला. पुढे नवीन अधीक्षकांनी पदभार स्वीकारल्यानंतर मंत्रालयाच्या नगररचना विभागाने गोंदियात कारागृह उभारण्यास प्रस्ताव सादर केला आहे.



### आयजी ऑफिसम ध्येच प्रस्ताव पडून

**येथील कारागृहाला १२ वर्षांपासून मंजुरी मिळाली असून, तो प्रस्ताव सध्या पोलिस महासंचालक कारागृह यांच्या कार्यालयात पडून आहे. तो प्रस्ताव शासनाकडे गेल्याशिवाय या कारागृहासाठी निधी मिळणार नाही.**

### ५०० आरोपींची क्षमता असेल

**जिल्ह्यातील आरोपींना या कारागृहात ठेवण्यात येणार असून, ५०० कैदी ठेवण्याची क्षमता राहणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील आरोपींना आता भंडारा कारागृहात नेण्याचा पोलिसांचा त्रास वाचण्यास मदत होईल.**

### ९.८५ हेक्टर आरम ध्ये होणार बांधकाम

**पोलिस मुख्यालयाच्या मागील भागात ९.८५ हेक्टर आरवर कारागृहासाठी जागा राखीव करण्यात आली. मंजुरी दिली आणि जागा पाहण्याचे आदेश दिले. भंडारा कारागृह अधीक्षकांनी गोंदियातील पोलिस मुख्यालयाच्या मागील जागेची पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्यास सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागाने आराखडा तयार केला. मात्र, गेली १२ वर्षे हा आराखडा शासनाकडे गेलाच नसल्याची माहिती आहे. त्या संबंधात अंदाजपत्रक आराखडा तयार करून त्याला खर्च किती येणार याचा अहवाल शासनाने मागितला आहे. तो आराखडा तयार करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आले. मात्र, १२ वर्षांपासून हा आराखडा शासनाकडे गेलाच नसल्याची माहिती आहे.**

### १२ वर्षांनंतर जागा हस्तांतरण

**सन २०११-१२ मध्ये मंजूर झालेल्या कारागृहासाठी जागा पाहण्यात आली. त्या कारागृहासाठी जागा निश्चित करण्यात आल्यानंतर ती जागा २०२४ मध्ये कारागृह विभागाला हस्तांतरित झाल्याचे भंडारा येथील कारागृह अधीक्षक देवराव आडे यांनी सांगितले.**

# कचारगड येथील साठवण बंधारा ठरतोय जीवनदायी

## बंधाऱ्यामुळे परिसर झाला वन्यप्राण्यांसाठी नंदनवन

सालेकसा : कचारगड गुफा परिसरातील डोंगराच्या कुशीतून उद्गमित झालेल्या नाल्यावर जल संधारण विभागाने तयार केलेला वक्र पद्धतीचा पुलवजा साठवण बंधारा २०२४ मध्ये पूर्ण झाला. या बंधाऱ्यात वर्षभर स्वच्छ व निमर्ळ पाणी उपलब्ध होत आहे. या बंधाऱ्यामुळे कचारगड परिसरात शासनाची पाणी अडवा पाणी जिरवा मोहीम शंभर टक्के यशस्वी झाली आहे. येथील आकर्षक जलसाठा येणाऱ्या भाविकांना वेड लावणारा ठरत असून स्वच्छ निमर्ळ पाण्यामुळे आणि वृक्ष संवर्धनाला पोषक ठरत असल्याने या परिसरात विविध प्रकारच्या वन्यजीवांसाठी नंदनवन ठरत आहे.

भारतीय संविधान अनुच्छेद ३७५ (१) अंतर्गत मौजा कचारगड धनेगाव येथील माँ कली कंकाली कचारगड देवस्थान या स्थळाचा विकास करणे या योजनेअंतर्गत कचारगड येथे वक्र पद्धतीच्या साठवण बंधारा पूर्ण करण्यात करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याच्या पूर्व सीमेवरील अखेरच्या टोकावर 'बालाघाट की पहाडिया' या निसर्गरम्य परिसरात कचारगड येथे गोंड आदिवासी संस्कृती भाविकांचे महाकली कंकाली पारी कोपार लिंगो कचारगड हे देशभरातील प्रसिद्ध देवस्थान आहे. येथे आशिया खंडातील सर्वात मोठी नैसर्गिक गुंफा असून दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात माघ पौर्णिमेला पाचदिवसीय कचारगड यात्रा भरते. यात देशभरातून आदिवासी भाविक दर्शनासाठी येतात. हे देवस्थान दक्षिण-पूर्व मध्य रेल्वेच्या मुंबई-हावडा मार्गावर असून दरेकसा रेल्वे स्थानकापासून ३ किलोमीटर अंतरावर आहे.

कचारगड यात्रा व्यतिरिक्त वर्षभर येथे भाविक आणि पर्यटकांची ये-जा सुरू असते. कचारगड देवस्थान जाण्यासाठी मार्ग अतिशय दुर्गम व डोंगराळ आहे. अशात या परिसरात वर्षभर पाण्याची उपलब्धता व्हावी म्हणून उपाययोजना करण्याची गरज होती. ही बाब लक्षात घेता मृद व जलसंधारण विभागांतर्गत उपविभाग सालेकसाकडून वक्र पद्धतीच्या पूल वजा साठवण बंधाऱ्याचे काम करण्यात आले. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविक व पर्यटकांना एकीकडे पुलावरून येणे-जाणे सुगम झाले आहे. त्याच वेळी स्वच्छ व निमर्ळ पाणीसुद्धा उपलब्ध झाले आहे. या बंधाऱ्याच्या बांधकामाकरिता प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प देवरी यांचे अधिनस्थ ३९.७४ लक्ष निधी मंजूर झाला असून बंधाऱ्याचे काम व्यवस्थितरीत्या पूर्ण झाले आहे. हा बंधारा अतिशय आकर्षक पद्धतीने तयार करण्यात आला असून डोंगराच्या कुशीतून निघणारा झरा पुढे नाल्याच्या स्वरूपात पुढे वाहत जातो. या नाल्यावर पूल वजा बंधारा अनेक बाबतीत महत्त्वाचा आणि वन्यप्राण्यांसाठी जीवनदायी ठरत आहे.



**हा बंधारा तयार करताना जागेवर बांधकाम साहित्य पोहोचविण्यासाठी मोठी कसरत करावी लागली पण ठेकेदार आणि वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनात खूप छान साठवण बंधारा मूर्त स्वरूपात आला.**

**- पुरुषोत्तम मडावी**
**उपविभागीय अधिकारी**

### वर्षभर असते पाणी उपलब्ध

**या पूलवजा साठवण बंधाऱ्याची पाणी साठवण क्षमता २५.७३ घनमीटर असून बंधाऱ्याच्या जलपात्रात वर्षभर पाणीसाठा उपलब्ध राहण्याची दाट शक्यता आहे. पाणी साठ्याच्या वापर भाविक व पर्यटकांना निस्ताराकरिता हात-पाय धुणे किंवा अंघोळ करणे यासाठी होणार असून परिसरातील वन्यजीव पशुपक्ष्यांना पिण्यासाठी पाण्याची सोय झाली आहे. याशिवाय भूगर्भात पाण्याचा निचरा होऊन परिसरातील भूगर्भ पाणी पातळीवर येण्यास मदत होईल. तसेच परिसरातील जीवसृष्टी वृक्षवल्ली समृद्ध होऊन पर्यावरण सुधारण्यास मोलाचे योगदान राहील. खडतर डोंगर मार्ग चढत घाम आणि थकवा येणाऱ्या भाविकांना व पर्यटकांना हा बंधारा वन्यजीवांसाठी जीवनदायी ठरत आहे.**

# उपजिल्हा रुग्णालयाच्या जागेवर केले अतिक्रमण

**तिरोडा:-** जुन्या उपजिल्हा रुग्णालयाच्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेवर काही व्यापाऱ्यांनी अतिक्रमण केले. ते अतिक्रमण तोडून त्याठिकाणी पंचायत समितीची इमारत आणि व्यापारी संकूल तयार करण्यात यावे, असा ठराव जिल्हा परिषदेकडे पंचायत समितीने पाठविला.

तिरोडा येथील राणी अवंतीबाई चौकासमोरील उपजिल्हा रुग्णालयाच्या जुन्या इमारत परिसरात शहरातील काही दबंग व्यापाऱ्यांनी अतिक्रमण करून रिकाम्या जागेत मोठी दुकाने लावली आहेत. ही जागा भविष्यात जिल्हा परिषदेच्या आर्थिक उत्पन्नात भर देण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. याबद्दल पंचायत समितीच्या सभागृहात चर्चा करण्यात आली. त्यानंतर तसा ठरावदेखील जिल्हा परिषदेला पाठविण्यात आला. परंतु जिल्हा परिषदेने आतापर्यंत कोणतीही ठोस पावले उचलली नाही. या जागेत झपाट्याने मोठ्या संख्येत शहरातील व्यापाऱ्यांनी फुटपाथवर पक्की दुकाने तयार करून व्यापार करणे सुरू केले आहे. याकडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने भविष्यात ही जागा हाती लागणार नाही. पंचायत समितीने या जागेची मागणी पंचायत समितीच्या नवीन इमारतीसाठी जिल्हा परिषदेकडे केली असून तसा ठरावही पाठविला आहे. या जागेवर व्यापारी संकूल आणि पंचायत समितीची इमारत तयार करण्याची मागणी होत आहे.



# ११ महिन्यांत मुद्रांक शुल्कातून जिल्ह्याला मिळाले ५९ कोटी ४८ लाख रुपयांचे उत्पन्न!

**उद्दिष्टपूर्ती करण्याचे आमच्या विभागाचे प्रयत्न असणार आहेत. त्यात मार्चअखेरपर्यंत उत्पन्नात वाढ होईल, हे निश्चित आहे. त्यानुसार सर्वच कर्मचारी, अधिकारी कामाला लागले आहेत.**

**के. एस. कांबळे, सहायक उपनिबंधक**



**गोंदिया :** गेल्या ११ महिन्यांत मुद्रांक शुल्कातून संबंधित विभागाला फेब्रुवारी अखेरपर्यंत ६६.८ टक्के उद्दिष्ट पूर्ती करता आलेली आहे. त्यानुसार ५९.४८ कोटी रुपयांचे उत्पन्न आतापर्यंत मिळाले असल्याचे विभागाने दिली आहे.

आता उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी १९ दिवसांचा कालावधी असून त्यामध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. ५९.४८ कोटींचे उत्पन्न झाले अशी माहिती देण्यात आली. मुद्रांक शुल्क विभागाने मागील एप्रिल ते फेब्रुवारी २०२५ अखेरपर्यंत ६६.०८ टक्के वसुली केली आहे.

**रेडिरेकनर दर वाढणार**

१ एप्रिलपासून रेडिरेकनरच्या दरात वाढ होणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र, त्याबाबत निश्चितता नसली तरीही दरवर्षी यात काही ना काही वाढ होत असल्याने त्याचा फटका बसू नये, या उद्देशाने मार्चअखेरपर्यंत नव्या घरांचे रजिस्ट्रेशन करून घेण्यासाठी सध्या मुद्रांक शुल्क विभागात धावाधाव सुरू आहे. त्यामुळेच कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

### १६ हजार ६६ दस्तांची झाली नोंदणी

**१ गोंदिया जिल्ह्यातील आठही तालुक्यात मुद्रांक शुल्क विभागाकडे मागील ११ महिन्यांत तब्बल १६ हजार ६६ दस्तांची नोंदणी झाल्याची माहिती पुढे आली आहे. यात रहिवास, वाणिज्य आदींसह इतर दस्तांचा समावेश असल्याची माहिती दिली. या महिनाअखेर आणखी नोंदणी होईल, असे सांगण्यात आले. दर वाढणार असल्याने नागरिकांची या महिन्यातच नोंदणी करण्यासाठी धावपळ सुरू आहे.**

### उद्दिष्ट कितीचे ?

**मुद्रांक शुल्क विभागाला यंदा २० कोटींचे उद्दिष्ट होते. त्यानुसार फेब्रुवारी अखेरपर्यंत ६६.०८ टक्के उद्दिष्ट गाठण्यात आले आहे. यातून ५९.४८ कोटींची वसुली झाली आहे.**


## ग्रामपंचायत कार्यालय दवडीपार
## पंचायत समिती गोरेगाव,जि.प.गोंदिया
### जाहिर निविदा क्रं.१

दिनांक:-१८/०३/२०२५

ग्रामपंचायत कार्यालय दवडीपार पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परीषद गोंदिया हे १५ वा वित्त आयोग पं.स.स्तर अंतर्गत ग्रा.प. दवडीपार येथे सिमेंट रस्ता बांधकाम तसेच १५ वा वित्त आयोग ग्रा.प.स्तर अंतर्गत बंदिस्त नाली बांधकाम व ग्रा.प.इमारत दुरुस्ती करणे ऑफलाईन-निविदा बांधकाम विभाग जि.प. गोंदिया कडे यथायोग्य श्रेणीत पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावारी ऑफलाईन द्रि-लिफाफा पध्द्तीने मागवित आहे. निविदेची विस्तृत माहिती ग्रामपंचायत च्या नोटीसबोर्ड वर दिनांक १८ /०३ /२०२५ पासुन उपलब्ध आहे.

**निविदा तपशिल**

१)निविदा प्रसिध्दी व दाखल दिनांक- दिनांक १८/०३/२०२५ पासुन
२)निविदा अंतिम दिनांक - दिनांक २५/०३/२०२५ ला. ३.०० वा. पर्यत
३)निविदा उघडण्याची दिनांक - दिनांक २६/०३/२०२५ ला ३. ०० वा. शक्य झाल्यास
विस्तृत माहीती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल तसेच अटी व शर्ती सर्वाना लागु राहतील.

**सरपंच** — **ग्रामपंचायत कार्यालय दवडीपार**
**ग्रामपंचायत अधिकारी** — **ग्रामपंचायत कार्यालय दवडीपार**



## महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग
### ई निविदा सूचना क्र. १५ सन २०२४-२०२५
### Main Portal: http://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता,उपसा सिंचन यांत्रिकी विभाग क्रं.१. भंडारा पिन नंबर ४४१ ९०४ (दूरध्वनी क्रमांक ०७१८४ - २५२१६६) हे राज्यपाल,महाराष्ट्र राज्य यांचे वतीने पश्चात अर्हता निकष मध्ये पात्र होणारे कंत्राटदार यांचेकडुन खालील कामाकरिता ब-१ नमुन्यात ई-निविदा सक्षमता संच वरील संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

बी-१ कामाची ई-निविदा कागदपत्रे ही शासनाच्या उपरोक्त नमूद संकेतस्थळावर दिनांक १९/०३/२०२५ ते २६/०३/२०२५ या कालावधी पासून उपलब्ध राहतील सदर निविदेच्या विविध टप्यातील कार्यवाहीचे वेळापत्रक निविदा सुचनेमध्ये तसेच शासनाचे वरील प्रमाणे नमूद संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित रक्कम | बयाना रक्कम (१ टक्के) | बी-१ निविदा पुस्तिकेची किंमत | कामाची मुदत | अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंभोरा टप्पा-२ उपसा सिंचन योजना ता-कुही जि.नागपुर सदर योजनेतील ०२ नग नॉन रिटर्न व्हाल्वचे संकल्पन,निर्मिती, पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरण करण्याचे कामे. | ४१,४९,२८८/- | ४१,५००/- | २३६०/- | ०६ महिने | पश्चात अर्हता निकश मध्ये पात्र होणारे मुळ व्हाल्व उत्पादक |
| २ | देवरी नवेगाव उपसा सिंचन योजना जि. गोंदिया अंतर्गत नवीन आकस्मिक द्वार २२ मो-१ नगचे निर्विष्ट भाग,द्वार कळी व देश बैंक आकार ३०२.५ मो ३ नग पॅनल वनिर्विष्ट भाग इत्यादीच्या निर्मिती व उभारणी कामे. | ४०,४७,९४१/- | ४०,५००/- | २३६०/- | ०६ महिने | पश्चात अर्हता निकश मध्ये पात्र होणारे कंत्राटदार |
| ३ | रजेगाव काटी उपसा सिंचन योजना ता.गोंदिया,जि. गोंदिया सदर योजनेतील ०३ नग व्ही.टी. पंप व संलग्न उपकरणाचे वार्षीक परीचलन व परीरक्षण करण्याचे काम. | १०,७१,२९०/- | १०,८००/- | २३६०/- | १२ महिने | विद्युत ठेकेदाराची अनुज्ञाप्ती असलेले व पश्चात अर्हता निकश मध्ये पात्र होणारे कंत्राटदार |

१) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई निविदा कोरी प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
२) सविस्तर ई निविदा सूचना महाराष्ट्र शासनाचे इलेक्ट्रोनिक टेन्डर management http://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.
३) या कामाचे अंदाजपत्रक, दर विश्लेशन, मोजमापे, नकाशे इत्यादी कार्यकारी अभियंता कार्यालयात उपलब्ध आहेत.
४) वरील कामाची निविदामध्ये पश्चात अर्हता निकष समाविष्ट आहे.
५) निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही,
६) उपरोक्त दर GST विरहित.

कार्यकारी अभियंता,
उपसा सिंचन यांत्रिकी विभाग
क्रं.१, भंडारा

स.माहिती/नाग/जाहिरात क्र./८५१/२०२५

# एक एप्रिलपासून अर्जुनी मोर. तालुक्यातील चारही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद

**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील रामपुरी, अर्जुनी मोरगाव, खांबी आणि सिरेगाव या चार प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या माध्यमातून मागील १२ वर्षांपासून ६५ गावांना पिण्याचे पाणी पुरवठा केला जात आहे. मात्र, शासनाने १ एप्रिल २०१९ पासून अनुदान बंद केल्याने या योजना चालवणाऱ्या संस्था आर्थिक अडचणीत सापडल्या आहेत. त्यामुळे संस्थांनी आज १६ मार्च रोजी नवेगावबांध येथील ग्रीन पार्क हॉटेलमध्ये सभा घेत येत्या १ एप्रिल २०२५ पासून चारही योजना पूर्णतः बंद करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला आहे.



## संस्थाचालक आणि गावकऱ्यांचा एकमताने निर्णय

**या महत्त्वाच्या सभेला चारही योजनांशी संबंधित गावांचे सरपंच, संस्थेचे संचालक व कर्मचारी उपस्थित होते. या वेळी उपस्थित सदस्यांनी एकमताने पाणीपुरवठा योजना बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे जर शासनाने तातडीने हस्तक्षेप करून अनुदान मंजूर केले नाही, तर ६५ गावांना पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे.या निर्णयामुळे ६५ गावांतील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शासनाने तातडीने लक्ष घालून अनुदान मंजूर करावे, अशी मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे. अन्यथा, भविष्यात मोठ्या पाणीटंचाईच्या समस्येला तोंड द्यावे लागेल.**



## शासनाच्या अनुदान अभावामुळे निर्णय

**या पाणीपुरवठा योजनांचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. वाढलेली मजुरी, रसायनांचा खर्च, विजेचे बिल आणि पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक इतर खर्च मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. अनुदान मिळत नसल्याने या योजना दरवर्षी ४ ते ५ लाख रुपयांच्या तोट्यात जात आहेत. जिल्हा परिषदेमार्फत शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला गेला, मात्र अद्याप अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे संस्थाचालकांनी शासनाने १ एप्रिल २०२५ पूर्वी अनुदान दिले नाही, तर चारही योजना बंद करण्यात येतील, असा ठराव केला आहे.**

# नक्षलवाद्यांचा घातपाताचा डाव उधळला

**गडचिरोली :-** भामरागड तालुक्यातील कवंडे येथील जंगलात नक्षल्यांनी जमिनीत पुरुन ठेवलेली स्फोटके शोधून काढण्यात पोलिसांना यश आले आहे. यामुळे घातपात करण्याचा नक्षल्यांचा डाव पोलिसांनी उधळून लावला आहे.९ मार्चला गडचिरोली पोलीस दलाने छत्तीसगड सीमवरील शेवटचे गाव असलेल्या कवंडे येथे पोलिस ठाण्याची उभारणी करण्यात आली. शनिवारी कवंडे येथील पोलीस ठाण्यातील विशेष अभियान पथकाचे जवान परिसरात नक्षलविरोधी अभियान राबवीत असताना पोलीस मदत केंद्रापासून दक्षिणेला शंभर मीटर अंतरावर जंगलातील पायवाटेवर पोलिसांना एक भरमार बंदूक आढळली. शेजारच्या जागेत



काहीतरी संशयास्पद असल्याचा संशय आला.

त्यानंतर बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या जवानांनी अत्याधुनिक उपकरणाद्वारे त्या जागेची तपासणी केली असता जमिनीत दीड ते दोन फूट खोल स्फोटके दडवून ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी ही स्फोटके शिताफीने बाहेर काढून ती नष्ट केली. यामुळे पोलिसांचा घातपात करण्याचा नक्षल्यांचा डाव उधळून लावला गेला.

पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, एम. रमेश, सत्यसाई कार्तिक, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनात कवंडे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मंदार शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली.

# पशुपालन व दुग्ध व्यवसायाचा विकास करण्यासाठी शासन कटीबध्द-आमदार राजकुमार बडोले

**अर्जुनी-मोरगाव:-** पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण घटक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन दुग्ध उत्पादन वाढविणे शेतक-यांसाठी आर्थीकदृष्ट्या अत्यंत गरजेचे आहे. शेतक-यांनी धान व ईतर पिकांसोबतच भरपुर दुध उत्पादन देणारे संकरीत जनावरे पालन करुन पशु आरोग्य व्यवस्थापन करुन शासनाचे विविध योजनांचा लाभ घेवुन धवल क्रांतीच्या दिशेने वाटचाल करावी. अशा प्रदर्शनांच्या माध्यमातुन शेतकरी व पशुपालकांना नवे ज्ञान व दिशा मिळते.जे त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवु शकते. त्यासाठी पशुपालन व दुग्ध व्यवसायाचा विकास करण्यासाठी शासन कटीबध्द असल्याचे प्रतिपादन आमदार व माजी मंत्री ईजी.राजकुमार बडोले यांनी केले आहे. निमगाव येथे आयोजित तालुकास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन व मार्गदर्शन मेळाव्यात ता.१६ मार्च रोजी उदघाटक म्हणुन आमदार राजकुमार बडोले बोलत होते.



मेळाव्याचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर होतो. यावेळी जि. प. सभापती डॉ. लक्ष्मण भगत, दिपताई चंद्रिकापुरे, पौर्णिमाताई ढेंगे, माजी उपाध्यक्ष यशवंत गणविर, पं.स.सभापती आम्रपालीताई डोंगरवार, उपसभापती संदीप कापगते, कविताताई कापगते, श्रीकांत घाटबांधे, तानाजी लोखंडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. जे.के.तीटमे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, डॉ. के.पी.पटले जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पं.स. सदस्य होमराज पुस्तोडे, सविताताई कोडापे, नुतनलाल सोनवाने, नाजुक कुंभरे, पुष्पलताताई दृगकर, कुंदाताई लोगडे, शालिनीताई डोंगरवार, सौ. भागेश्वरीताई सय्याम, शैलजाताई सोनवणे माजी सभापती, वंदेश्वरीताई राऊत सरपंच ग्रा.पं. निमगाव, संदीप पुस्तोडे उपसरपंच निमगाव, विलाश फुंडे सरपंच पिंपळगाव, सचिन डोंगरे सरपंच चान्ना, सुखदेव मेंढे उपसरपंच सिलेझरी, छगन पातोडे उपसरपंच अरततोंडी, काशिनाथ कापसे उपसरपंच बोरटोला/इंजोरी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पशुपक्षी प्रदर्शनीमधे आलेल्या पशुपक्ष्यांची तज्ज्ञांकडून पहाणी त्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तर तालुक्यातील उत्कुष्ठ शेतकरी यांनाही सन्मानित करण्यात आले.यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.या प्रदर्शनीमधे बचत गटाचे माध्यामातुन शेतीवर व पशुसंबधी आधारीत विविध स्टाल सुध्दा लावण्यात आले. पशुपालनातुन शेतकरी यांना योग्य मार्गदर्शन मिळावे पशुपालनातुन शेतकरी समृध्द व्हावा या उद्देशानेच मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची भुमिका उपसभापती संदिप कापगते यांनी प्रास्ताविकातुन मांडली.संचालन महेश राठोड यांनी तर उपस्थितांचे आभार डि.के.लांजेवार यांनी मानले.

# वीज यंत्रणेजवळ कचरा जाळू नका; महावितरणचे नागरिकांना आवाहन

**नागपूर :-** उन्हाळ्याच्या तीव्रतेत वाढ झाल्यामुळे विजेच्या उपकरणांजवळ कचरा जाळल्यास धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन महावितरणने केले आहे. वीज वाहिन्या, वितरण रोहित्र, फीडर पीलर किंवा वितरण पेट्यांजवळ कचरा जाळण्याच्या प्रकारामुळे वीज यंत्रणेला धोका निर्माण होऊन सर्वसामान्य नागरिकांसोबतच वीज वितरण कंपनीला नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे वीज यंत्रणेजवळ कचरा टाकू नये आणि त्यास जाळूही नये, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

शहरी व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी वीजवाहिन्या, फिडर पिलर, वितरण रोहित्र, वितरण पेटी किंवा डी.पी. अशा वीज यंत्रणेजवळील उघड्यावर असलेल्या जागेत कचरा टाकण्यात येतो. वीज यंत्रणेजवळ साठवलेला हा कचरा पेटविल्याने किंवा इतर कारणामुळे कचरा जळाल्याने विजेच्या भूमिगत केबल व इतर वीज यंत्रणा आगीमुळे नादुरुस्त झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पर्यायाने संबंधित परिसरातील वीजपुरवठाही खंडित झालेला आहे. दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत असल्याने कचऱ्यास आग लागण्याचे प्रकार वाढत आहेत. वीज यंत्रणा उन्हामुळे तापलेली असल्याने अशातच अशा आगीमुळे वीज वितरण यंत्रणेचे तापमान वाढल्यास यंत्रणेला त्याचा फटका बसतो. उपरी वीजवाहिन्याखाली असलेल्या कचऱ्याचा ढिग पेटल्यामुळे किंवा त्याला आग लागल्यामुळे वीजतारा वितळून वीज खंडित होण्याचा धोका अधिक आहे. नागरिकांनी उघड्यावर असलेल्या वीज यंत्रणेला धोका निर्माण होईल अशा ठिकाणी कचरा टाकू नये किंवा साठवलेला कचरा जाळू नये.



अशा घटनांतून वीज यंत्रणेला आग लागल्यास १९१२ किंवा १९१२०, १८००-२१२-३४३५ आणि १८००-२३३-३४३५ या टोल फ्री क्रमांकांवर किंवा नजीकच्या महावितरण कार्यालयाला त्याची सूचना देण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

### शॉर्ट सर्किटचा धोका

घरगुती विद्युत उपकरणे आणि दिवे अति गरम झाल्याने शॉर्ट सर्किटचा धोका होऊन आग लागण्याचीही शक्यता असते. घरगुती वायरिंग किंवा नादुरुस्त स्विचेस आणि उपकरणांमुळेही शॉर्ट सर्किट होण्याची शक्यता आहे. इलेक्ट्रिकल आउटलेट्स किंवा एक्स्टेंशन कॉर्ड ओव्हरलोड झाल्यास याशिवाय वायरिंगमध्ये कित्येक वेळी सैल जोड वा कनेक्शन असतात, कालांतराने हे जोड कार्बनाइज होतात.

कधी कधी हे जोड सैल असल्यामुळे व त्याला घट्ट इन्सुलेशन न केल्यामुळे उंदीर, पाल आदी या वायर कुरतडतात व हळूहळू त्यामुळे स्पार्किंग सुरु होते व प्रसंगी शॉर्ट सर्किट होऊन आग लागण्याची शक्यता असते. अशा वेळी प्रथम घरातील मेन स्विच बंद करावा व मगच पाणी न वापरता कार्बन डायऑक्साइड, कोरडी रेती यांच्या साहाय्याने आग विझविण्याचा प्रयत्न करावा. त्यापूर्वी याची सूचना अग्निशमन विभागाला देण्याचे आवाहनही महावितरणतर्फे करण्यात आले आहे. नॅशनल इलेक्ट्रिक कोड प्रमाणे वायरिंगचे आयुष्य २० ते २५ वर्षे असावे असे निर्देश आहेत. घरगुती वायरिंगला २० वर्षे झाल्यावर ग्राहकाने एखाद्या मान्यताप्राप्त किंवा महाराष्ट्र शासनाचा अनुज्ञप्तीधारक विद्युत कंत्राटदाराकडून आवश्यक त्या चाचण्या करून घेत त्याच्या सूचनेनुसार वायरिंग बदलून घेण्याचे आवाहनही महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

## आग लागण्याच्या घटनांमध्ये वाढ

**मागिल काही दिवसांत नागपूर शहरासह मौदा तालुक्यातील पावडदौना, बाभुळगाव तालुक्यातील गळवा, आर्वी येतेह आग लागण्याच्या घटना झाल्या आहेत, वाढत्या तापमानासोबतच कचरा टाकल्याने अथवा जाळल्यामुळे देखील अशा घटना घडत असल्याने नागरिकांनी वीज यंत्रणेजवळ कचरा टाकू नये आणि त्यास जाळूही नये, असे आवाहन महावितरणने केले आहे.**

# मधुमेह जनजागृती मेळावा उत्साहात



**गोंदिया :-** मनोहरभाई पटेल अकॅडमी व दिशा संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने गेल्या २५ वर्षांपासून मधुमेह जागृती कार्यक्रम राबविला जात आहे. या उपक्रमाला २५ वर्षे झाल्याबद्दल मधुमेह जनजागृती मेळाव्याचे आयोजन रविवारी स्थानिक नमाद महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सुनील गुप्ता यांच्या हस्ते माजी आ. राजेंद्र जैन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. डॉ. देवाशिष चटर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २५ वर्षांपासून मधुमेह जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. आहारतज्ज्ञ डॉ. कविता गुप्ता नागपूर व त्यांच्या चमूद्वारा मधुमेह विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले जाते. मधुमेहग्रस्त रुग्णांना कुठल्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे, आहार कसा घ्यावा, यावर सविस्तर मार्गदर्शन केले जाते. डॉ. कुदळे, विनोद अग्रवाल व दिशा संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य हा उपक्रम वर्षभर राबवितात. हॅलो डायबिटीज या कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ. सुनील गुप्ता विदर्भात ठिकठिकाणी मार्गदर्शनाचे काम करीत आहेत. कार्यक्रमाचे डॉ. देवाशिष चॅटर्जी यांनी प्रास्ताविक मांडले.

## तिरोडा येथे २१ मार्चला जिल्हास्तरीय पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**गोंदिया :-** जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र गोंदिया व श्रीयांश प्रायव्हेट आयटीआय सहकार नगर तिरोडा यांच्या संयुक्त विद्यमाने २१ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता श्रीयांश प्रायव्हेट आयटीआय सहकार नगर, तिरोडा येथे जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये ६ कंपन्यांचे उद्योजक सहभागी होणार असून ५५० रिक्त जागांवर भरती करणार आहेत.

इयत्ता दहावी व बारावी पास, आयटीआय तसेच कोणत्याही शाखेचा पदवीधर अशा पात्रता असणाऱ्या बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगाराची सुवर्ण संधी आहे. उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेची छायांकीत प्रमाणपत्रे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया या कार्यालयाचे नोंदणी कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया कार्यालयाचे दूरध्वनी क्र.०७१८२-२९९१५० यावर संपर्क साधावे.

# अतिक्रमण नियमित करून पट्टे द्या

**आमगाव :-** नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या आठ गावातील गरीब लोकांची घरे ही शासकीय भूखंडावर बांधण्यात आली आहेत. त्यांचे अतिक्रमण नियमित करून पट्टे देण्यात यावेत अशी मागणी अतिक्रमणधारकांनी केली आहे. या मागणीसाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना माजी आमदार भेरसिंग नागपुरे व माजी जि.प. अध्यक्ष विजय शिवनकर यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले.

आमगाव नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या आठ गावांतील लोकांनी काही शासकीय पडीक जमिनीवर २५ ते ३० वर्षे आधी तात्पुरत्या स्वरूपात कच्चे घर बनवले आहे. ते लोक ग्राम पंचायत असताना ग्रामपंचायतीकडे व नंतर नगरपंचायत व नगरपरिषद बनल्यानंतर नगरपरिषदेकडे जमिनीवरील करसुद्धा नियमित रूपाने जमा करीत आहेत.



परंतु त्या जमिनीवरील कच्च्या घराला पक्के घर बनवण्याकरिता, शासनाच्या घरकुल योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या पात्र असताना सुद्धा शासनाकडे या जमिनीची या लोकांच्या नावे नियमित पट्ट्याची नोंद नसल्यामुळे अडचण येत आहे. इतर जागी जमिनीचे दर आकाशाला भिडले असल्यामुळे ही जमीन सोडून नवीन जमीन खरेदी करणे आता त्या लोकांना शक्य नाही. शासनाच्या लक्षात ही गोष्ट आणून देत त्या लोकांना जमिनीचे अधिकृत पट्टे मिळवून देण्याकरिता माजी आमदार नागपुरे, माजी जि.प. अध्यक्ष शिवनकर, बालाजी बिसेन, काशीराम हुकरे यांनी मुंबईला महाराष्ट्राचे महसूल मंत्री बावनकुळे यांच्याशी स्वतः भेट घेतली. तसेच लवकरात लवकर यावर तोडगा काढत लोकांच्या नावे जमिनीचे अधिकृत पट्टे करण्याविषयीची विनंती निवेदन देऊन केली. त्यावर मंत्री बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिक्रिया देत लवकरात लवकर समस्या मार्गी काढण्याचे आश्वासन दिले.

## आदिवासी उमेदवारांसाठी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना २५ मार्च पर्यंत अर्ज सादर करावे

**गोंदिया :-** स्पर्धापूर्व परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आदिवासी जमातीमधील उमेदवारांना मार्गदर्शन व प्रशिक्षणाची आवश्यकता असल्याने प्रामुख्याने आदिवासी बहुल परिसरात महाराष्ट्र शासनाने ही योजना सुरु केलेली आहे. स्पर्धापूर्व परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून आदिवासी उमेदवारांना कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र देवरी कार्यालयामार्फत माहिती व मार्गदर्शन दिल्या जाते. देवरी येथील प्रशिक्षण केंद्र जानेवारी १९८६ पासून कार्यान्वित आहे.

# रेल्वे प्रवाशांची अडचण झाली दूर

## तिकीट आरक्षण केंद्राच्या वेळेत वाढ : अनेक दिवसांपासूनची प्रलंबित मागणी मार्गी

**गोंदिया :-** गोंदिया-चांदाफोर्ट मार्गावरील सौंदड हे एक प्रमुख रेल्वे स्थानक आहे. या रेल्वे स्थानकावरून मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रवास करतात. पण या रेल्वे स्थानकावरील रेल्वे तिकीट आरक्षण केंद्र हे केवळ दुपारी ३ ते सायंकाळी पाच या कालावधी सुरू राहत होते. याचा प्रवाशांना फटका बसत होता. मात्र, आता ही अडचण दूर झाली असून या स्थानकावरील रेल्वे तिकीट आरक्षण केंद्र दुपारी १२ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.

दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वे विभागाचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक यांनी यासंबंधीचे आदेश सोमवारी (दि.१७) काढले आहेत. सौंदड रेल्वे स्थानकावरील संगणकीकृत तिकीट आरक्षण केंद्र सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. यासाठी एक अतिरिक्त लिपिक नियुक्त करण्यात येणार आहे. लिपिकाची नियुक्ती होईपर्यंत हे केंद्र दुपारी १२ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. यामुळे प्रवाशांची मोठी अडचण दूर झाली आहे. गोंदिया चांदाफोर्ट मार्गावरील महत्त्वपूर्ण स्थानकांपैकी सौंदड हे एक महत्त्वपूर्ण रेल्वे स्थानक आहे.

या रेल्वे स्थानकावरून शेकडो प्रवासी दररोज प्रवास करतात. बसच्या तुलनेत रेल्वे गाडीचे तिकीट कमी असल्याने गोरगरीब प्रवाशांसाठी ते सोयीचे आहे. सौंदड रेल्वे स्थानकावर पॅसेंजर व एक्सप्रेस गाड्या थांबतात. मात्र या रेल्वे स्थानकावरील तिकीट आरक्षण केंद्र हे मोजक्याच वेळेत सुरू राहत असल्याने तिकीट आरक्षण करण्यासाठी येणाऱ्या प्रवाशांना बरेचदा आल्या पावलीच परत जावे लागत होते. ही अडचण लक्षात घेत माजी जिल्हा परिषद सभापती अशोक लंजे यांनी रेल्वे विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर दक्षिण पूर्वमध्य रेल्वे विभागाचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंह यांनी तिकीट आरक्षण केंद्राच्या वेळेत वाढ करण्याचे आदेश काढले आहेत. यामुळे बऱ्याच वर्षानंतर प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.




## १७ रेल्वे स्थानकांवर वॉटर व्हेंडिंग मशीन

**प्रवाशांची सोय आणि आरोग्य लक्षात घेऊन दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागातील विविध रेल्वे स्थानकांवर योग्य नळ पाणीपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी १७स्थानकांवर लवकरच वॉटर व्हेंडिंग मशीन बसविण्यात येणार आहे. प्रवाशांना स्वच्छ, शुद्ध आणि थंड पिण्याचे पाणी मिळू शकते. तुमसर रोड, भंडारा रोड, आमगाव, गोंदिया, डोंगरगड, राजनांदगाव, छिंदवाडा, तिरोडा, बालाघाट, वडसा, कळमना, ब्रह्मपुरी, चांदाफोर्ट या स्थानकांचा समावेश आहे.**

## एक्सप्रेस गाड्यांच्या थांब्यासाठी लढा

**सौंदड रेल्वे स्थानकावर जबलपूर एक्सप्रेस इतर एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्यात यावा या मागणीसाठी लंजे यांनी लढा सुरु केला आहे.**

# राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा वाचवा, शिक्षकांचे धरणे आंदोलन

**गोंदियाः-** राज्य सरकारने काढलेला १५ मार्चचा संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करा, शिक्षक सेवक पद रद्द करा, सर्व समित्या रद्द करून एकच शाळा व्यवस्थापन समिती ठेवा, शालेय परीक्षा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात घ्या, इत्यादी मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर सोमवारी धरणे आंदोलन करण्यात आले.



शाळेत २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्या आहे. अशा शाळेत नवीन संच मान्यतेनुसार शिक्षकाचे एकही पद मंजूर झालेले नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात २५ हजारांपेक्षा अधिक प्राथमिक शिक्षक अतिरिक्त ठरत आहे. कमी पटसंख्येच्या उच्च प्राथमिक शाळातील वर्गासाठी शिक्षकाचे पदच शिल्लक न राहिल्याने त्या शाळेतील विद्यार्थ्यांना एकही शिक्षक मिळणार नाही.

शिक्षण हक्क कायदा २००९ मधील कलम १९ व २५ नुसार इयत्ता पहिली ते आठवीसाठी विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक संख्या निश्चित केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न भविष्यात निर्माण होणार आहे. अनेक विद्यार्थ्यांसह प्रामुख्याने मुलींचे शिक्षण थांबणार आहे. त्यातून गळती वाढेल आणि विद्यार्थिनी शैक्षणिक प्रवाहापासून बाहेर पडतील. ही स्थिती केवळ महाराष्ट्रातच निर्माण झालेली आहे, असे प्राथमिक शिक्षक समितीचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ग्रामीण भागातील शैक्षणिक व्यवस्था उद्ध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय ताबडतोब रद्द करा, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.

संघटनेच्या आंदोलनात माजी आमदार दिलीप बनसोड, माजी जि.प.सदस्य गंगाधर परशुरामकर,शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके, विभागीय अध्यक्ष किशोर डोंगरवार, शिक्षक भारतीचे अध्यक्ष सुशील बनसोड,जिल्हा नेते सुरेश रहांगडाले, सरचिटणीस संदिप मेश्राम, राज्य कार्यकारणी सदस्य शरद पटले, उपाध्यक्ष एच. एस.बिसेन, महिलाध्यक्ष ममता येडे, सरचिटणीस प्रतीमा खोब्रागडे, गौतम बांते, मुकेश रहांगडाले कार्याध्यक्ष, एस यू वंजारी, हरिराम येरणे, विनोद बडोले कार्याध्यक्ष,दिलीप नवखरे,उत्तम टेंभरे, बी एस केसाळे, कृष्णा कहालकर, दिनेश उके, राज कडव ,अशोक बिसेन, शोभेलाल ठाकूर, दिलीप लोदी, उमेश रहांगडाले, सतीश दमाहे , राजेंद्र बोपचे, सौ भारती तिडके यु.जी. हरीणखेडे, संजय बोपचे, के.जी रहांगडाले, गजानन पाटणकर, पूर्णानंद ढेकवार, दिनेश बिसेन, जीवन म्हशाखेत्री, आशिष कापगते,अनिल वट्टी, विलास डोंगरे, सुरेंद्र मेंढे, मिथुन चव्हाण, सेवकराम रहांगडाले, रतन गणवीर, रेवानंद उईके , विजेंद्र केवट,मीनाक्षी पंधरे, कु.स्नेहा रामटेके, सौ उत्तरा परदे, कु. सपना शामकुवर, कु. प्रेमलता बघेले, वंदना झो, देवीकिरण शहारे, कु.गीता लांडेकर, कु. रीता राऊत, सौ खेमलता मोरघडे,उषा पारधी, प्रिया बोरकर, कु. हिना बोपचे, कु. शारदा अंबादे, कु.मंजुश्री लढी, सुप्रिया तांदळे, कु. वनिता झोडे यासह बहुसंख्येने समिती पदाधिकारी उपस्थित होते.

# खोडशिवनी येथील वीज उपकेंद्र त्वरित सुरू करा

## परशुरामकर यांची मागणी : मुख्य अभियंत्यांना दिले मागणीचे निवेदन

**सडक अर्जुनी:-** तालुक्यातील ग्राम खोडशिवनी येथे ३३ केव्ही वीज उपकेंद्र मंजूर होऊन त्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. आता उन्हाळ्यात विजेची मागणी वाढली असून डव्वा येथील उपकेंद्रांवर दाब वाढणार. अशात खोडशिवनी येथे उपकेंद्र त्वरित सुरु करा अशी मागणी सरपंच गंगाधर परशुरामकर यांनी वीज वितरण कंपनीचे मुख्य अभियंता रंगारी यांना निवेदन देऊन केली आहे.

ग्राम खोडशिवनी येथे ३३ केव्ही वीज उपकेंद्र मंजूर होऊन त्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

त्यासाठी ग्रामपंचायतीने जमीन उपलब्ध करुन दिली होती. या कामावर सुमारे सहा कोटी रुपये खर्च होणार होते या उपकेंद्राला सौंदड येथून रेल्वे लाईन ओलांडून वीजपुरवठा करण्यात येणार आहे.



या उपकेंद्राचे काम पूर्ण झाले आहे, पण रेल्वे विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यास उशीर होत आहे. आता उन्हाळा तापू लागला असून परिसरातील बहुतांश गावे डव्वा येथील उपकेंद्राशी जोडलेली आहेत; पण डव्वा उपकेंद्रावर जास्त दाब येत असल्याने शेतकरी व घरगुती वीज ग्राहक अडचणीत आले आहेत.

याची दखल घेत जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व सरपंच परशुरामकर यांनी वीज वितरण कंपनीचे मुख्य अभियंता रंगारी यांची भेट घेऊन शेतकरी बांधवांनी उन्हाळी पीक घेतल्याने ते अडचणीत येत आहेत. करिता उपकेंद्र तातडीने सुरू करावे अशी मागणी केली. यावर त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांसोबत संपर्क करून येत्या आठ दिवसांत हे उपकेंद्र सुरू करण्याचे आश्वासन दिले. निवेदन देताना पंचायत समिती सदस्य डॉ. आर. बी. वाढई, उपसरपंच सत्यवान नेवारे व वीज वितरण कंपनीचे चौधरी उपस्थित होते.